


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २३४ * नांदेड * बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावली, उपचारासाठी नकार

**जालना (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवाली सराटी येथील ११व्या आमरण उपोषणाचा चौथा दिवस होता. जरांगे यांची प्रकृती खालवली आहे. जालन्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून रात्री मनोज जरांगे यांच्या प्रकृतीची विचारपूस करत डॉक्टरांशी चर्चा केली. पण जरांगे पाटलांनी उपचारासाठी नकार दिला आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषण सुरू असून, त्यांच्या प्रकृतीकडे सरकारचे लक्ष आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीवर तोडगा काढण्यासाठी सरकारचे शिष्टमंडळ पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील यांची भेट घेण्याची शक्यता आहे. यापूर्वी झालेल्या चर्चेनंतरही आंदोलन सुरूच असल्याने सरकारकडून पुढील चर्चेसाठी हालचाली सुरू झाल्याचे समोर येत आहे. त्यामुळे या भेटीत काय तोडगा निघतो, याकडे लक्ष लागले आहे.



उपोषणाच्या समर्थनार्थ अंतरवाली सराटीत मराठा बांधवांचे लोंढे सतत दाखल होत आहेत. जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जरांगे यांची भेट घेऊन पाठिंबा दिला.

मराठा बांधवांनी आंतरवालीत गर्दी न करता ५-६ सप्टेंबरपासून मुंबईकडे निघावे. मात्र, आझाद मैदानाकडे न जाता मित्र-नातेवाइकांकडे थांबावे, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी म्हणजे ३१ऑगस्ट रोजी केले.

मराठा आरक्षण प्रश्नावर शिंदेसेनेचे मंत्री उदय सामंत, भाजप नेते आमदार प्रसाद लाड यांनी पुण्यात मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यानंतर सामंत म्हणाले की, जरांगेंच्या उपोषणाबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री शिंदेंशी चर्चा झाली आहे. जरांगेंशी २४ तासांत चर्चा करून मार्ग काढला जाईल. त्यांनी कोणाच्या सांगण्यावरून गैरसमज करून घेऊ नयेत. ओबीसींचे आरक्षण कमी न करता मराठा समाजाला आरक्षण देणे. मराठा समाजाने आंदोलनासाठी मुंबईत येऊ नये, यासाठीही सरकार प्रयत्नशील आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्याशीही मुंबईत आंदोलन करू नये यासाठी चर्चा करण्यात येणार आहे. लाड म्हणाले, काही अधिकारी दिशाभूल करणारी माहिती देत असल्याच्या जरांगेंच्या तक्रारीबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्यात आली. त्याची योग्य ती दखल घेतली जाईल, असे ते म्हणाले.

## एमपीएससी परीक्षेच्या गुणांमध्ये मोठी तफावत; २५० पैकी २, ६ अन् ११ गुण, पारदर्शकतेवर पुन्हा प्रश्नचिन्ह

**मुंबई (प्रतिनिधी)–** पेपरफुटीमुळे चर्चेत आलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग म्हणजे एमपीएससीचा गोंधळ सुरूच असून आता राज्यसेवा परीक्षेच्या मुख्य परीक्षेतही घोळ असल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी केल्या आहेत. काही विद्यार्थ्यांना २५० पैकी २, ६ आणि ११, १४ असे गुण मिळाले आहेत. तर काही विद्यार्थी हे मराठी या क्वालिफाईंग पेपरमध्येच नापास झाले आहेत. गुणांची तफावत लक्षात घेता हे पेपर्स तपासताना पारदर्शकता ठेवण्यात आली नसल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला.

आयोगाकडून मुख्य परीक्षेसाठी यूपीएससीच्या धर्तीवर पहिल्यांदाच लेखी परीक्षा घेण्यात आली. त्याचे गुणही जाहीर करण्यात आले आहेत. मात्र आता त्यावरही विद्यार्थ्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

निबंधाच्या आणि जीएस पेपरच्या गुणांमध्ये मोठी तफावत, निबंधाच्या पेपरमध्ये काही विद्यार्थ्यांना १५० हून जास्त गुण, तर काही विद्यार्थ्यांना १४ किंवा अगदीच कमी गुण, ऑप्शनलच्या एका पेपरमध्ये खूप गुण, तर दुसऱ्या पेपरमध्ये अगदीच कमी गुण, काही विषयांमध्ये १०० हून अधिक गुण, तर काही विषयांमध्ये खूपच कमी गुण, समाजशास्त्रासारख्या काही ऑप्शनल पेपर्समध्ये तुलनेने कमी गुण, इतर विषयांमध्ये चांगले गुण असले तर मराठी आणि इंग्रजी या क्लालिफाईंग पेपरमध्ये एखाद्या दुसऱ्या गुणांनी नापास होणे, अशा तक्रारी विद्यार्थ्यांनी केल्या आहेत.

# ठाकरेंचे तबब्ल १४ आमदार नवरात्रीपूर्वी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार?

### शिवसेना नेत्याचा दावा!

**मुंबई (प्रतिनिधी)–** आगामी नवरात्रीच्या आधी शिवसेना ठाकरेंचे १४ आमदार शिंदेंच्या शिवसेनेत पक्ष प्रवेश करणार असल्याचा दावा शिवसेना शिंदे गटातील बड्या नेत्याने केला आहे. या १४ आमदारांना शिवसेनेत आणण्याची जबाबदारी तीन मंत्र्यांवर देण्यात आली आहे, अशी माहितीही शिंदेसेनेतील बड्या नेत्याने दिली आहे. सध्या उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडे एकूण २० आमदार आहेत. या २० आमदारांपैकी १४ आमदार शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंकडे असलेल्या २० आमदारांपैकी कोणते १४ आमदार शिंदे गटात प्रवेश करणार?, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील मंत्र्यांवर ऑपरेशन टायगरची जबाबदारी देण्यात आल्याची माहिती शिवसेना शिंदे गटातील बड्या नेत्याने दिली आहे. या १४ आमदारांपैकी ६ आमदारांना सरकारमध्ये चांगली खाती आणि मंत्रिपदे देण्यात येणार आहेत. यापैकी काहींची महामंडळ अध्यक्ष आणि राज्यमंत्रीपदी वर्णी लागण्यावर पक्षांतर्गत चर्चा अंतिम टप्प्यात पोहोचल्याची माहितीही समोर आली आहे. नवरात्रीपूर्वी या आमदारांचा पक्ष प्रवेश झाल्यास ठाकरेंच्या शिवसेनेला आणखी एक धक्का बसण्याची शक्यता आहे.

यापूर्वी नुकतंच ठाकरेंच्या शिवसेनेच्या ६ खासदारांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. तो धक्का ताजा असताना आता ही नव्याने चर्चा सुरु झाल्याने ठाकरेंची धाकधूक वाढण्याची शक्यता आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २०२२ मध्ये तब्बल ४० आमदारांना सोबत घेत अखंड शिवसेनेत ऐतिहासिक बंड केलं. यानंतर ४ वर्षांनी पुन्हा एकदा इतिहासाची पुनरावृत्ती झाली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे ६ खासदार शिंदेंच्या गळाला लागले होते. त्यानंतर आता पुन्हा २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत जिंकलेले ठाकरेंचे २० आमदार शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंना पुन्हा एकदा धक्का बसण्याची शक्यता आहे.

## पंतप्रधान मोदींचा फोटो हटवल्याप्रकरणी पुण्यात कारवाई, मनसेच्या दोन पदाधिकाऱ्यांना अटक

**पुणे (प्रतिनिधी)–** पुण्यातील सरकारी तंत्रशिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांची पाहणी करण्यासाठी गेलेले महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांचा दौरा चांगलाच चर्चेत आला. याठिकाणी अमित ठाकरे मुख्याधापकांच्या कार्यालयात उभे असताना एका विद्यार्थ्याने छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेजारी नरेंद्र मोदींचा फोटो लावण्यात आल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. तेव्हा अमित ठाकरे यांनी शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाजूला नरेंद्र मोदी यांचा फोटो कशाला, असे मुख्याधापकांना विचारले. एवढेच नव्हे तर पुढच्याच क्षणाला मनसेच्या प्रशांत कनोजिया, विक्रांत भिलारे या कार्यकर्त्यांनी नरेंद्र मोदी यांचा फोटो तिथून खाली उतरवला. त्यानंतर आता या दोन्ही कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रशांत कनोजिया आणि विक्रांत भिलारे या दोन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या दोन पदाधिकाऱ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदींचा फोटो हटवल्याबद्दल अटक करण्यात आली आहे. चतुःश्रृंगी पोलीसांनी अमित ठाकरेंसोबत मनसेच्या या कार्यकर्त्यांनी मोदींचा फोटो हटवला होता. काल अमित ठाकरे यांच्यासह २० ते २५ जणांवर पुण्यातील चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता, तर रात्रीच्या सुमारास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या दोन पदाधिकाऱ्यांना पुणे पोलिसांनी रात्री उशिरा दोघांना अटक केली आहे.

# नांदेड जिल्ह्यासाठी आज 'येलो अलर्ट'

### विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पावसाचा अंदाज; सतर्कतेचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी आज दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी एका दिवसासाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

दि. २ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्यासह विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणा व नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्यावतीने करण्यात आले आहे.

विजांच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास नागरिकांनी शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे. मोकळ्या जागेत असल्यास जवळपास सुरक्षित इमारत उपलब्ध नसल्यास सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. झाडांखाली किंवा धोकादायक ठिकाणी थांबू नये. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर उभे राहणे टाळावे. घरामध्ये असताना विद्युत उपकरणे सुरू असल्यास ती त्वरित बंद करावीत. तारांचे कुंपण, विजेचे खांब तसेच इतर लोखंडी वस्तूंपासून दूर राहावे. पाण्यात उभे असल्यास तात्काळ पाण्याबाहेर पडावे.

आकाशात वीज चमकत असताना घरातील लँडलाईन दूरध्वनीचा वापर करू नये. शॉवरखाली अंघोळ करणे तसेच घरातील नळ, पाण्याच्या पाइपलाइन अथवा इतर विद्युत उपकरणांना स्पर्श करणे टाळावे. विजांच्या कडकडाटासह वादळी वारे सुरू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पुणे पालिकेच्या कनिष्ठ अभियंता परिक्षेत चष्म्यामधील छुपा कॅमेऱ्याचा गैरप्रकार

**पुणे (प्रतिनिधी)–** पुणे महापालिकेच्या कनिष्ठ अभियंता पदासाठीच्या परिक्षेत चष्म्यामध्ये छुपा कॅमेरा बसवून गैरप्रकार केल्याच समोर आलं आहे. गैरप्रकार करणारे तीन विद्यार्थी, त्यांना साथ देणारे टीसीएस कंपनीचे दोन कर्मचारी आणि एक अज्ञात व्यक्ती अशा सहा जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, मात्र या गैरप्रकारात फक्त तीन विद्यार्थी सहभागी नसुन इतरांचाही सहभाग असल्याचा आरोप परिक्षा देणाऱ्या इतर अभियंत्यांनी केला आहे.

पुणे महापालिककडून १६९ कनिष्ठ अभियंता पदांसाठी २०२४ मध्ये जाहीरात काढण्यात आली होती. पुणे, मुंबई, नागपूर, अमरावती, कोल्हापूर, नांदेड आणि छत्रपती संभाजी नगर या शहरांत २२ एप्रिल, २३ एप्रिल आणि २९ एप्रिलला घेण्यात आली. १६९ जागांसाठी या विविध शहरांमधून बावीस हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी ही परिक्षा दिली. मात्र परिक्षेनंतर या परिक्षेचा पेपर सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने पुणे महापालिकेच्यावतीने ही परिक्षा घेण्याची जबाबदारी असलेल्या टीसीएस आणि आयबीपीएस या कंपन्यांना तक्रार देण्यात आली.

# स्वारातीम विद्यापीठ परिसरात विद्यार्थ्यांसाठी 'गोल्फ कार'ची सुविधा

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विस्तीर्ण परिसरात विद्यार्थ्यांना एका संकुलातून दुसऱ्या संकुलात तसेच प्रशासकीय इमारतीत जाणे सुलभ व्हावे, यासाठी विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने 'गोल्फ कार'ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या गोल्फ कारचे उद्घाटन मंगळवारी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा परिसर सुमारे ५५० एकरांवर विस्तारलेला आहे. या विस्तीर्ण परिसरात विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक संकुले, विभाग तसेच प्रशासकीय इमारतीमध्ये ये-जा करताना मोठे अंतर पायी पार करावे लागत होते. विद्यार्थ्यांची ही गैरसोय लक्षात घेऊन विद्यापीठ प्रशासनाने पर्यावरणपूरक आणि आधुनिक वाहतुकीचा पर्याय म्हणून गोल्फ कारची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.



ही गोल्फ कार बॅटरीवर चार्ज होणारी असून सौरऊर्जेवरही चार्ज करता येणार आहे. एकावेळी सात विद्यार्थ्यांना प्रवास करता येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांची ये-जा अधिक सुलभ होण्याबरोबरच पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन मिळणार आहे.

गोल्फ कारच्या उद्घाटनप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य महादेव गव्हाणे, डॉ. प्रशांत पेशकार, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. सुरेखा भोसले, इंजिनिअर नारायणराव चौधरी, डॉ. हनुमंत कंधारकर, ज्येष्ठ सिनेट सदस्य प्रमोद देशमुख, डॉ अशोक गुजराती, प्राचार्य डॉ. बालाजी कांबळे, प्राचार्य डॉ. दीपक बच्चेवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखा अधिकारी डॉ राजेश शिंदे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.

विद्यापीठ प्रशासनाच्या या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना मोठ्या परिसरात सुरक्षित, सुलभ आणि पर्यावरणपूरक पद्धतीने प्रवास करता येणार असून, विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी-केंद्रित सुविधांमध्ये आणखी एक महत्त्वाची भर पडली आहे. यामुळे विद्यार्थी आनंदीत झाले आहेत.

## डिजीटल अरेस्टने ३१ लाखांचा गंडा, तर बनावट बिस्किट दाखवून आजीच्या गळ्यातील सोनसाखळी लंपास

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात फसवणुकीच्या दोन वेगवेगळ्या घटना उघडकीस आल्या असून नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. डिजीटल अरेस्टची भीती दाखवून ३१.२० लाखांची फसवणूकीची घटना पुढे आली आहे.





सायबर सेलमध्ये दाखल झालेल्या फिर्यादीनुसार, दि. २१ ते २५ ऑगस्ट दरम्यान श्रीनगर, नांदेड येथील एका व्यक्तीला आरोपी अमनकुमार शर्मा आणि संदीपराव यांनी व्हॉट्सअॅप कॉल केला. पोलीस गणवेशात स्वतः ला केंद्र शासनाचे अधिकारी भासवून 'डिजीटल अरेस्ट'ची भीती दाखवली आणि ऑनलाईन ३१ लाख २० हजार २०० रुपयांची फसवणूक केली.

याप्रकरणी सायबर सेल ठाण्यात गु.र.नं. १५/२०२६ अन्वये बीएनएस कलम ३१८(२)(४), ३१९(२), ३०८(६)(७), ३(५) व आयटी ॲक्ट कलम ६८ (डी)(सी) नुसार गुन्हा दाखल झाला असून तपास पोलीस निरीक्षक वसंत सप्रे करत आहेत.

दुसरी घटना धर्माबाद येथे घडली. दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी ११.४० वाजता सार्वजनिक रोडवर दोन अनोळखी तरुणांनी ७० वर्षीय मंगलाबाई मोहनराव कोंडावार (रा. पटेल नगर, धर्माबाद) यांना बनावट पिवळ्या धातूचे बिस्किट दाखवून दिशाभूल केली आणि त्यांच्या गळ्यातील ६१ हजार रुपयांची सोन्याची चैन घेऊन पळ काढला.

याबाबत धर्माबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. २०९/२०२६ अन्वये बीएनएस कलम ३१८(२), ३(५) नुसार गुन्हा दाखल असून तपास सपोउपनि पठाण करीत आहेत.




## कारच्या धडकेत विद्यार्थिनी ठार

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्कुटीला पाठीमागून भरधाव कारने जोरदार धडक दिल्याने एलएलबी द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या २० वर्षीय विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना मंगळवार, दि. १ सप्टेंबर रोजी सकाळी रोड क्रमांक २६ वर घडली. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत विद्यार्थिनीचे नाव मानसी संजयकुमार जाधव (वय २०, रा. विष्णुनगर) असे आहे.

मानसी ही नारायणराव चव्हाण लॉ कॉलेजमध्ये एलएलबीच्या द्वितीय वर्षांत शिक्षण घेत होती. मंगळवारी १ सप्टेंबर रोजी सकाळी ती घरून स्कुटीवरून कॉलेजला जाण्यासाठी निघाली होती. रोड क्रमांक २६ वरून जात असताना मागून आलेल्या एम.एच. २६ बी.ई. ४१३६ क्रमांकाच्या कारने तिच्या स्कुटीला जोरदार धडक दिली. कारची धडक एवढी भीषण होती की मानसी रस्त्यावर कोसळून



बेशुद्ध पडली. अपघाताची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेश पुरी व हवालदार गोपीनाथ फुलारी आणि ए. एल. वाघमारे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत वजिराबाद येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर तिला मृत घोषित केले. या प्रकरणी कारचालकाविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

## गरज पडलं तरच सोनं घ्या, परदेशात फिरायला जाऊ नका

### पंतप्रधान मोदींचा पुन्हा देशवासियांना कानमंत्र

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** गरज पडलं तरच सोनं विकत घ्या, परदेशात फिरायला जाऊ नका, विदेशात लग्नसोहळे टाळा, असा पुन्हा कानमंत्र देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना दिला आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेने चालू आर्थिक वर्षातील एप्रिल ते जून या तिमाहीत ७.८ टक्के इतका विकास दर नोंदवल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी देशवासियांचे आभार मानले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी मंगळवारी सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर करत देशवासियांशी संवाद साधला. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी देशवासियांना एक महत्त्वाचे आवाहन केले. देशाचा आर्थिक विकासदर सध्या चांगला आहे. ही गती कायम ठेवायची असेल तर आपल्याला स्वदेशी आणि आत्मनिर्भर भारत या दोन धोरणांचा अधिकाअधिक अवलंब करावा लागेल. त्यासाठी परदेशातील प्रवास टाळा. विदेशात जाऊन लग्नसोहळे करणे टाळा, असा सल्ला पंतप्रधान मोदी यांनी दिला.

भारतीय अर्थव्यवस्थेने ७.८ टक्के इतका आर्थिक विकासाचा दर नोंदवला. यासाठी देशवासियांना खूप खूप शुभेच्छा. संपूर्ण देश आनंदाने भरुन गेला आहे. हे जनतेच्या पुरुषार्थ, संकल्पशक्ती आणि सामूहिक शक्तीचे प्रतीक आहे. संपूर्ण जग युद्धात बुडालं आहे. चारही बाजूंनी संकटांच्या बातम्या येत आहेत. जगभरातील पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. या सगळ्याला पार करुन, हे निराशेचे वातावरण भेदून भारतीय अर्थव्यवस्थेने ७.८ टक्के इतका आर्थिक विकासदर नोंदवला. ही गती कायम राखायची असेल तर आपल्याला आत्मनिर्भर भारत आणि स्वदेशी या दोन धोरणांचा आग्रहाने अवलंब करावा लागेल, असे मोदींनी म्हटले.

## अर्धापूर-लहान रोडवर कार मोटारसायकलच्या अपघातात युवक ठार

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** अर्धापूर-तामसा रोडवर लहान शिवारात मोटारसायकल कारची धडक झाली. या धडकेत मोटारसायकलवरील युवकाचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवार, दि.१ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वा. घडली.



लहानकडे जाणाऱ्या मोटारसायकल व नांदेडकडे जाणाऱ्या कारचा अपघात होऊन या अपघातात मोटारसायकल चालक संतोष महादू धुमाळे (वय २०) रा. चाभरा शिवार हा गंभीर जखमी झाला होता. जखमी युवकाला महामार्गाच्या रुग्णालय वाहिकेतून अर्धापूर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला तपासणी करून मृत घोषित केले. या अपघाताची माहिती मिळतात पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर, पोलीस कर्मचारी महेंद्र डांगे, ज्ञानेश्वर भिसे,विजय कदम, महामार्गाचे किर्तीकुमार कवठेकर, चालक शैलेश शिरसे, सेवक वसंत सिनगारे यांनी घटनास्थळी भेट दिली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# मराठीचा सन्मान हवा; पण शासनाची धरसोड नको!

महाराष्ट्र शासनाने परप्रांतीयांना मराठी भाषा शिकण्यासाठी दिलेली मुदत आणखी एक वर्षाने वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. भाषेच्या प्रसारासाठी आणि महाराष्ट्रात येणाऱ्या प्रत्येकाला मराठीशी जोडण्यासाठी शासनाने केलेली ही प्रक्रिया योग्य दिशेने जाणारी असली तरी एखादा नियम केला असेल, तर त्याची अंमलबजावणी करण्याची राजकीय आणि प्रशासकीय इच्छाशक्तीही शासनाने दाखवली पाहिजे. त्यामुळे लोक शासनावर विश्वास ठेवतील. महाराष्ट्र ही केवळ भौगोलिक सीमा नसून एक समृद्ध भाषा, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक मूल्ये असलेली भूमी आहे. येथे रोजगार, व्यवसाय किंवा अन्य कारणांसाठी देशाच्या विविध भागांतून लोक येतात, हे स्वाभाविक आहे. महाराष्ट्राने नेहमीच बाहेरून येणाऱ्यांचे स्वागत केले आहे. मात्र स्वागतशीलता म्हणजे स्थानिक भाषा आणि संस्कृतीकडे दुर्लक्ष करण्याची मुभा नव्हे. आपण ज्या राज्यात जातो, त्या राज्याची भाषा, संस्कृती आणि सामाजिक संकेत यांचा आदर करणे ही किमान सामाजिक जबाबदारी आहे आणि असं करण्याची इच्छा नसल्यास त्या व्यक्तींना त्या राज्यांमध्ये राहण्याचा नैतिक अधिकार आहे का, याचाही विचार झाला पाहिजे. महाराष्ट्रात अनेक वर्षे राहून या ठिकाणी मोठमोठे व्यवसाय चालविणारे अनेक लोक सुद्धा अशीच मुजोरी दाखवतात. रिक्षा, टॅक्सी, दुकाने, हॉटेल्स आणि अन्य सार्वजनिक सेवांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींचा आणि व्यवसायिकांचा स्थानिक नागरिकांशी दररोज मोठ्या प्रमाणावर संपर्क येतो. त्यामुळे अशा क्षेत्रात काम करणाऱ्यांना स्थानिक भाषा येणे अधिक आवश्यक ठरते. प्रवाशाला व ग्राहकाला त्याच्या भाषेत संवाद साधता आला, त्याच्या समस्या समजून घेता आल्या आणि सेवेत सुसंवाद राहिला, तर त्यातून सामाजिक सलोखाच वाढतो. म्हणूनच महाराष्ट्रात उपजीविकेसाठी येणाऱ्या प्रत्येकाने मराठी शिकण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणे अपेक्षित आहे. परंतु दुसरीकडे काही अमराठी रिक्षाचालकांची वाढती मुजोरीही दुर्लक्षित करता येणार नाही. प्रवाशांशी उद्धटपणे बोलणे, मनमानी भाडे आकारणे, जवळचे अंतर असल्या-मुळे प्रवास नाकारणे, प्रवाशांशी गैरवर्तन करणे अशा तक्रारी सातत्याने ऐकायला मिळतात. विविध गुन्ह्यां-मध्ये अशा लोकांचाच भरणा सर्वाधिक असल्याचे दिसून आले, हे विशेष. मराठी भाषेचा सन्मान हवा असेल तर अमराठी व मराठी माणसाच्या वर्तनातूनही तो सन्मान दिसला पाहिजे. परप्रांतीय रिक्षाचालकांविषयी निर्माण होणारा असंतोष केवळ भाषेच्या प्रश्नामुळे निर्माण झालेला नाही. भाषिक संवादाचा अभाव, स्थानिक नियमांचे पालन न करणे, वाहतूक नियमांचे पालन न करणे, कुठेही गाडी उभे करणे, महिलांशी गैरव्यवहार करणे, असे प्रकार सर्रास दिसून येतात. प्रवाशांशी होणारे गैरसमज आणि काही ठिकाणी दिसणारी स्पर्धात्मक असुरक्षितता यामुळेही हा असंतोष वाढतो. त्यामुळे या प्रश्नाकडे केवळ 'मराठी विरुद्ध परप्रांतीय' अशा संघर्षाच्या चष्म्यातून पाहणे धोकादायक आहे. या ठिकाणी प्रश्न आहे तो वर्तनाचा. तसाच हा प्रश्न आहे तो कायदा, शिस्त, भाषा आणि परस्पर सन्मानाचा. शासनाने मराठी शिकण्याची सक्ती केली असेल तर तिची स्पष्ट, पारदर्शक आणि सर्वांना समान लागू होणारी अंमलबजावणी करावी. एक वर्षाची मुदतवाढ दिल्यानंतर पुन्हा अशीच मुदतवाढ देण्याची वेळ येऊ नये. नियम करण्यापेक्षा त्यांची अंमलबजावणी अधिक महत्त्वाची असते. अन्यथा शासनाचे निर्णय केवळ कागदावर राहतात. याचबरोबर मराठी शिकणे ही शिक्षा नसून संधी आहे, असा सकारा-त्मक संदेशही शासनाने दिला पाहिजे. परप्रांतीयांसाठी सुलभ मराठी प्रशिक्षण, परीक्षा केंद्रे आणि प्रमाणपत्राची व्यवस्था उपलब्ध करून देता येईल. मराठी शिकली तर रोजगाराच्या संधी, सामाजिक संवाद आणि महाराष्ट्राशी भावनिक नाते अधिक दृढ होईल. महाराष्ट्रात राहणाऱ्याने मराठीचा सन्मान केला पाहिजे; आणि महाराष्ट्राच्या भूमीत जन्मलेल्या मराठी माणसानेही आपल्या भाषेचा सन्मान आपल्या आचरणातून सिद्ध केला पाहिजे. भाषेचा अभिमान हा दुसऱ्याचा अपमान करून नव्हे, तर स्वतःची भाषा आत्मविश्वासाने जगून व्यक्त झाला पाहिजे. शासनाने आता धरसोड वृत्ती सोडून ठाम धोरण स्वीकारण्याची वेळ आली आहे. नियम सर्वांसाठी समान असावेत, त्यांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी आणि भाषेच्या प्रश्नाला राजकीय संघर्षाचे रूप न देता सामाजिक समन्वयाचा मार्ग स्वीकारावा. मराठीचा सन्मान हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा विषय आहे; पण त्या अस्मितेला न्याय देण्यासाठी शासनाची ठाम भूमिका आणि मराठी माणसाचे संयमी, जबाबदार वर्तन, दोन्ही तितकेच आवश्यक आहेत.

# आंदोलनांची वाढती संख्या आणि संवादाची घटती जागा!




लोकशाहीत संघर्ष आवश्यक असतो; पण संघर्षाला संवादाची जोड मिळाली तरच तोडगा निघतो. लोकशाही म्हणजे केवळ मतदानाचा दिवस नव्हे. लोकशाही म्हणजे जनतेला प्रश्न विचारण्याचा अधिकार, आपल्या मागण्या मांडण्याचे स्वातंत्र्य आणि सत्ताधाऱ्यांनी त्या मागण्या ऐकून घेण्याची जबाबदारी. त्यामुळे आंदोलन हे लोकशाहीचे शत्रू नसून तिचे एक महत्त्वाचे अभिव्यक्तीचे माध्यम आहे. मात्र, जेव्हा प्रत्येक प्रश्नाचा पहिला मार्ग आंदोलन आणि शेवटचा मार्गही आंदोलनच ठरतो, तेव्हा कुठेतरी संवादाची जागा कमी होत असल्याची जाणीव होते.

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाकडे पाहिले तर विविध मागण्यांसाठी आंदोलने, मोर्चे, उपोषणे, धरणे आणि निदर्शने होताना दिसतात. अलीकडे मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर पुन्हा आंदोलन तीव्र झाले आहे. २९ ऑगस्टपासून मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू झाले असून सरकारकडून कायदेशीर चौकटीत मार्ग काढण्याची भूमिका व्यक्त करण्यात आली आहे. हा एका समाजाचा किंवा एका मागणीचा प्रश्न म्हणून पाहण्यापेक्षा लोकशाहीतील आंदोलन आणि संवादाच्या बदलत्या नात्याचा प्रश्न म्हणून पाहण्याची गरज आहे.

जेव्हा एखाद्या समाजाला किंवा समूहाला आपला प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचत नाही, आपली मागणी गांभीर्याने घेतली जात नाही किंवा निर्णय प्रक्रियेत आपला आवाज ऐकला जात नाही, तेव्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला जातो. अनेक वेळा शांतपणे केलेल्या निवेदनांना, बैठकींना आणि चर्चांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची भावना निर्माण होते. मग रस्त्यावर उतरल्याशिवाय आपला आवाज ऐकला जाणार नाही, अशी मानसिकता तयार होते. ही मानसिकता केवळ आंदोलकांची चूक म्हणून नाकारता येणार नाही. सत्तेने वेळेवर संवाद साधला नाही तर आंदोलनाला खतपाणी मिळते.परंतु याच वेळी आंदोलनकर्त्यांनीही लोकशाहीची मर्यादा विसरता कामा नये. आपली मागणी योग्य असली तरी तिची पूर्तता कोणत्या घटनात्मक, कायदेशीर आणि प्रशासकीय चौकटीत शक्य आहे, याचाही विचार आवश्यक आहे.

संवादाची पहिली खिडकी बंद का होते? आजच्या राजकीय आणि सामाजिक वातावरणात एक विचित्र विरोधाभास दिसतो. सोशल मीडिया, दूरदर्शन, मोबाईल आणि इंटरनेटमुळे संवादाची साधने प्रचंड वाढली आहेत; पण मनापासून ऐकण्याची तयारी मात्र कमी होत चालली आहे. नेते आपले म्हणणे सांगतात, आंदोलक आपली भूमिका मांडतात, समाजमाध्यमांवर हजारो प्रतिक्रिया उमटतात; पण समोरच्याचे म्हणणे शांतपणे ऐकण्याची प्रक्रिया कुठेतरी मागे पडते. संवाद म्हणजे केवळ बैठकीचे आयोजन नव्हे. संवाद म्हणजे दुसऱ्याच्या भूमिकेचा आदर करणे. संवाद म्हणजे मतभेद असतानाही एकमेकांचे म्हणणे समजून घेणे. संवाद म्हणजे 'माझेच बरोबर' या हट्टातून बाहेर पडून 'सर्वमान्य मार्ग कोणता?' हा प्रश्न विचारणे.

**आंदोलन आवश्यक आहे;**
**पण आंदोलन हा शेवट नसावा**

भारतीय लोकशाहीने अनेक मोठी आंदोलने पाहिली आहेत. सामाजिक परिवर्तनासाठी, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी, कामगारांच्या हक्कांसाठी, शिक्षणासाठी, आरक्षणासाठी आणि विविध सामाजिक मागण्यांसाठी आंदोलने झाली आहेत. अनेक आंदोलनांनी व्यवस्था बदलली, कायदे बदलले आणि सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडले. म्हणून आंदोलनाला विरोध करणे म्हणजे लोकशाहीच्या अधिकारालाच विरोध करणे होय.पण आंदोलनाचा उद्देश व्यवस्था जाळणे नसून व्यवस्था जागी करणे हा असला पाहिजे.

आंदोलनाने सरकारला प्रश्न विचारला पाहिजे. सरकारने त्या प्रश्नाला उत्तर दिले पाहिजे. आंदोलकांनी दबाव निर्माण केला पाहिजे. सरकारने त्या दबावाचे रूपांतर निर्णयप्रक्रियेत केले पाहिजे. आणि या दोन्ही प्रक्रियांमध्ये कायदा, संविधान आणि सामाजिक सलोखा यांची सीमा अबाधित राहिली पाहिजे. लोकशाहीत सरकारकडे सत्ता असते आणि म्हणूनच त्याच्याकडे संवादाची अधिक मोठी जबाबदारी असते. एखादा प्रश्न मोठ्या आंदोलनाचे रूप धारण करण्यापूर्वीच त्यावर चर्चा झाली पाहिजे. संबंधित समाजप्रतिनिधी, तज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांना एका टेबलावर आणून प्रश्नाची मुळापासून चिकित्सा केली पाहिजे.

विशेषतः आरक्षणासारखे प्रश्न अत्यंत संवेदनशील असतात. त्यामध्ये सामाजिक भावना, ऐतिहासिक संदर्भ, शैक्षणिक संधी, रोजगार, घटनात्मक तरतुदी आणि न्यायालयीन निकष अशा अनेक बाबींचा विचार करावा लागतो. त्यामुळे अशा प्रश्नांना केवळ राजकीय घोषणांनी उत्तर मिळत नाही; कायदेशीर आणि घटनात्मकदृष्ट्या टिकणारा तोडगा आवश्यक असतो. सरकारने जनतेला केवळ आश्वासन न देता काय शक्य आहे, काय शक्य नाही आणि त्यासाठी कोणती प्रक्रिया आवश्यक आहे, हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. आंदोलकांचीही जबाबदारी आहे. लोकशाही अधिकारांसोबत लोकशाही कर्तव्यही येते. आंदोलनाचा अधिकार जितका महत्त्वाचा आहे तितकाच सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण, सामान्य नागरिकांची गैरसोय टाळणे, कायदा-सुव्यवस्था राखणे आणि शांतता टिकवणे हाही महत्त्वाचा भाग आहे. आंदोलनामुळे रुग्णवाहिका अडकली, विद्यार्थ्यांचे नुकसान झाले, कामगारांचे रोजगाराचे दिवस गेले किंवा सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर अनावश्यक परिणाम झाला तर आंदोलनाचा नैतिक आधार कमकुवत होऊ शकतो. म्हणूनच शांततापूर्ण, शिस्तबद्ध आणि संविधानिक आंदोलन हीच लोकशाहीची खरी ताकद आहे.

आज संवादाची नवी संस्कृती निर्माण करण्याची गरज आपण आंदोलन थांबवू शकत नाही आणि थांबवायलाही नको. कारण ज्या समाजात प्रश्न विचारण्याची मुभा नसते, त्या समाजात लोकशाही जिवंत राहत नाही.पण आपण एक गोष्ट नक्की करू शकतो. सरकारने 'आंदोलन वाढू दे, मग पाहू' अशी भूमिका घेऊ नये. आंदोलकांनीही 'रस्त्यावर उतरल्याशिवाय काहीच मिळणार नाही' अशी मानसिकता कायम ठेवू नये. दोन्ही बाजूंनी एक पाऊल मागे येऊन संवादाच्या टेबलावर बसण्याची तयारी ठेवली पाहिजे. कारण शेवटी सरकार जिंकणे किंवा आंदोलक जिंकणे हा लोकशाहीचा विजय नसतो. प्रश्नाचा न्याय्य आणि टिकाऊ तोडगा निघणे हाच खरा विजय असतो. आज महाराष्ट्राला संघर्षाची नव्हे, तर समन्वयाची गरज आहे. समाजातील विविध घटकांच्या मागण्या आहेत, अपेक्षा आहेत, अस्वस्थता आहे. प्रत्येक प्रश्नाला राजकीय चष्म्यातून पाहिले तर समाज अधिक विभागला जाईल.

आपण प्रश्नांना 'हा त्यांचा प्रश्न' आणि 'हा आमचा प्रश्न' असे विभागत गेलो तर सामाजिक सलोखा धोक्यात येईल. त्याऐवजी प्रत्येक प्रश्नाकडे 'हा आपल्या समाजाचा प्रश्न आहे' या भावनेने पाहिले पाहिजे. आरक्षणा-चा प्रश्न असो, शेतकऱ्यांचा प्रश्न असो, बेरोजगारी असो, शिक्षणाचा प्रश्न असो किंवा महागाईचा प्रश्न वेगळे असले तरी त्यामागची मानवी वेदना समान आहे.

आज प्रश्न असा नाही की आंदोलने का होत आहेत? खरा प्रश्न असा आहे की, लोकांना आंदोलन करण्याची वेळ येण्यापूर्वी आपण त्यांचे म्हणणे का ऐकत नाही? आणि दुसरा प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. आंदोलन सुरू झाल्यानंतरही संवादाचा दरव-ाजा बंद का राहतो? लोकशाहीत रस्त्यावरचा आवाज महत्त्वाचा आहे; पण त्याहून महत्त्वाचा आहे तो आवाज ऐकून घेणारा कान.

सरकारने कान उघडे ठेवले पाहिजेत. समाजाने संयम ठेवला पाहिजे. आंदोलकांनी शिस्त पाळली पाहिजे. राजकीय पक्षांनी प्रश्नांचे राजकारण करण्यापेक्षा प्रश्न सोडविण्याला प्राधान्य दिले पाहिजे. कारण आंदोलनाची आग पेटवणे सोपे असते; पण ती आग संवादाच्या पाण्याने शांत करणे हीच खरी नेतृत्वाची कसोटी असते. आंदोलन लोकशाहीचा आवाज आहे. संवाद लोकशाहीचा विवेक आहे. आवाज आणि विवेक यांचा समतोल साधला, तरच लोकशाही अधिक सक्षम, संवेदनशील आणि सुंदर बनेल.

**-पंडित पवळे,**
नांदेड
मो. ९८९०२३२९६२

# वाहतूक कोंडीचा विळखा; सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेशिवाय पर्याय नाही!

रस्त्यांवरील वाढती वाहतूक कोंडी ही आजच्या शहरी जीवनातील सर्वांत गंभीर समस्यांपैकी एक बनली आहे. मुंबई असो, ठाणे, कल्याण, नवी मुंबई असो किंवा मुंबईला जोडणारे राज्य व राष्ट्रीय महामार्ग असोतबहुतेक प्रम ुख मार्गांवर दिवसेंदिवस वाहतुकीचा ताण वाढताना दिसत आहे. दिवस असो वा रात्र, सकाळ असो वा संध्याकाळ, अनेक महत्त्वाच्या रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या दिसतात. पूर्वी शनिवार-रविवार, सण किंवा सलग सुट्ट्यांच्या काळात जाणवणारी वाहतूक कोंडी आता रोजच्या जीवनाचा भाग बनली आहे. ही परिस्थिती केवळ वाहनचालकांसाठी त्रासदायक नाही, तर शहराच्या अर्थव्यवस्थेवर, पर्यावरणावर आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही त्याचा गंभीर परिणाम होत आहे.

वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचा मोठ्या प्रमाणात वेळ वाया जातो. पूर्वी एखादा प्रवास एक ते दीड तासात पूर्ण होत असेल, तर आता त्याच प्रवासासाठी दोन ते तीन तास किंवा त्याहून अधिक वेळ लागत असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येते. विशेषतः सकाळच्या आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत वाहनांची गती अक्षरशः कासवाच्या गतीने होते. कामावर जाणारे कर्मचारी, विद्यार्थी, व्यापारी, रुग्णालयात जाणारे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसह सर्वसामान्य नागरिकांना याचा मोठा फटका बसतो. वाहतूक कोंडीत अडकलेल्या रुग्णवाहिकांमुळे आपत्कालीन परिस्थितीत गंभीर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे वाहतूक कोंडी हा केवळ गैरसोयीचा विषय नसून तो सार्वजनिक सुरक्षेशीही संबंधित प्रश्न आहे.

वाहनांची संख्या वाढत असताना रस्त्यांची क्षमता मात्र त्या प्रमाणात वाढत नाही. शहरांमध्ये उपलब्ध असलेली जागा मर्यादित आहे. त्यामुळे कितीही रस्ते रुंद केले, उड्डाणपूल बांधले किंवा नवीन मार्ग तयार केले तरी वाहनांची संख्या सातत्याने वाढत राहिली, तर काही काळाने पुन्हा वाहतूक कोंडी निर्माण होणारच. त्यामुळे केवळ रस्ते बांधणे हा वाहतूक कोंडीवरील कायमस्वरूपी उपाय होऊ शकत नाही.

वाहतूक सुरळीत करण्यासाठी शासन आणि प्रशास-नाने विविध ठिकाणी उड्डाणपूल, भुयारी मार्ग, रस्ते रुंदीकरण आणि इतर पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत. हे



प्रयत्न निश्चितच आवश्यक आहेत; परंतु अनेक ठिकाणी उड्डाणपूल ओलांडल्यानंतर पुन्हा वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. यावरून समस्या केवळ एखाद्या चौकाची किंवा एखाद्या रस्त्याची नसून संपूर्ण वाहतूक व्यवस्थेच्या नियोजनाशी संबंधित असल्याचे स्पष्ट होते.

अनधिकृत पार्किंगविरोधात कारवाई आवश्यक असली, तरी केवळ दंडात्मक कारवाई करून हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी नियोजित पार्किंग व्यवस्था, बहुम जली वाहनतळ, सार्वजनिक वाहनतळांची संख्या वाढवणे आणि उपलब्ध पार्किंग जागेचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. नवीन मोठ्या इमारती, व्यापारी संकुले आणि निव-ासी प्रकल्पांना मंजुरी देताना पार्किंगची पुरेशी व्यवस्था आहे की नाही, याकडेही गांभीर्याने पाहिले पाहिजे.

वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन वारंवार केले जाते. मात्र नागरिकांना सार्वजनिक वाहतूक वापरण्यासाठी ती सोयीची, सुरक्षित, वेळेवर आणि विश्वासार्ह असणे आवश्यक आहे.

बेस्ट, पीएमपीएमएल यांसारख्या सार्वजनिक वाह-तूक व्यवस्थेवर मोठ्या संख्येने नागरिक अवलंबून आहेत. मात्र बससेवेची अपुरी संख्या, अनियमित वेळापत्रक, गर्दी, मार्गांचे अपुरे नियोजन किंवा प्रवाशांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींमुळे अनेक नागरिक खासगी वाहनांकडे वळतात. नागरिकांना वेळेवर आणि आरामदायी सेवा मिळाली तर ते स्वतःचे वाहन वापरण्याऐवजी सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य देतील. म्हणून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा दर्जा सुधारण्याची जबाबदारी केवळ संबंधित परिवहन संस्थांची नाही, तर शासनाचीही आहे. बसची संख्या वाढवणे, मार्गांचे पुनर्नियोजन करणे, वेळापत्रकात सुधारणा करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि प्रवाशांसाठी सुरक्षित व सुलभ सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

महानगरांतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी केवळ बससेवा पुरेशी नाही. बस, उपनगरीय रेल्वे, मेट्रो, मोनोरेल आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांमध्ये योग्य समन्वय निर्माण करणे आवश्यक आहे. एका वाह-तूक साधनातून दुसऱ्या साधनाकडे प्रवाशांना सहजपणे जाता आले पाहिजे. स्थानकांजवळ बससेवा, पार्किंग, पादचारी मार्ग आणि इतर सुविधा उपलब्ध असतील तर सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढू शकतो.

'एकात्मिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था' ही भविष्यातील शहरांसाठी अत्यावश्यक गरज आहे. नागरिकांना घरापासून कामाच्या ठिकाणापर्यंत सहज, सुरक्षित आणि वेळेवर पोहोचता आले पाहिजे. अशी व्यवस्था निर्माण झाली तर खासगी वाहनांवरील अवलंबित्व निश्चितच कमी होईल.

शहरांचा विस्तार वेगाने होत असताना वाहतूक व्यवस्थेचे नियोजन मात्र त्याच वेगाने होत नसेल, तर भविष्यात परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. नवीन वसाहती, मोठ्या निवासी संकुलांना, कार्यालयांना, व्यापारी केंद्रांना आणि इतर प्रकल्पांना परवानगी देताना त्या भागातील वाहतुकीवर होणारा परिणाम विचारात घेणे आवश्यक आहे.

वाहतूक कोंडीचे व्यवस्थापन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचाही वापर वाढवायला हवा. सिग्नलचे वैज्ञानिक नियोजन, वाहतूक प्रवाहाचे डिजिटल निरीक्षण, रस्त्यांवरील अडथळ्यांवर त्वरित कारवाई आणि वाहतूक व्यवस्थापनासाठी उपलब्ध आकडेवारीचा वापर यामुळे वाहतुकीचे नियोजन अधिक परिणामकारक होऊ शकते.

रस्ते हे सर्वांसाठी आहेत. प्रत्येक नागरिकाने वाह-तूक शिस्त पाळली तर वाहतुकीचा प्रवाह अधिक सुरळीत होऊ शकतो. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई करण्याबरोबरच नागरिकांमध्ये वाहतूक शिस्तीबाबत सातत्याने जनजागृती करणेही गरजेचे आहे.

वाहतूक कोंडीची समस्या एका दिवसात निर्माण झालेली नाही आणि ती एका दिवसात संपणारही नाही. त्यासाठी दीर्घकालीन, सर्वसमावेशक आणि शाश्वत वाहतूक धोरणाची आवश्यकता आहे. रस्ते, उड्डाणपूल, पार्किंग, सार्वजनिक वाहतूक, रेल्वे, मेट्रो, सिग्नल व्यवस्था आणि शहर नियोजन या सर्वांचा एकत्रित विचार करावा लागेल.

शासनाने मोठमोठ्या प्रकल्पांवर खर्च करण्याबरोबरच विद्यमान सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या गुणवत्तेतही मोठी सुधारणा करावी. नागरिकांना स्वतः चे वाहन वापरण्यापेक्षा बस, रेल्वे किंवा मेट्रोने प्रवास करणे अधिक सोयीचे आणि वेळेची बचत करणारे वाटले पाहिजे. सार्वजनिक वाहतूक हा पर्याय नव्हे, तर शहराच्या वाहतूक व्यवस्थेचा कणा बनला पाहिजे.

**-श्याम ठाणेदार,**
औंढ, जि. पुणे

# भावनांना अभिव्यक्त करणारे माध्यम म्हणजे कविता...

कविता आण असते,कविता बाण असते, जगण्याचा श्वास असते, कवीची शान असते, वेदनेत होरपळलेली शब्दांची खाण असते,काळजावर पांघरलेली,जखमांची शाल असते, ओठावर अडखळलेलं शब्दांच रान असते,चिरदाह वेदनेवरची,तीच खरी औषधी असते,कविता म्हणजे वादळ विचारांचा गोंधळ असते,कधी हळवी भावना होऊन,मंगल विचारांची कामना असते,कविता म्हणजे साद, कधी चिघळणारा वाद असते,भळभळत्या जखमेवरचा तीच आर्त आवाज असते, कविता म्हणजे हुंकार शब्दांची धार असते, मनातल्या गाभाऱ्यातला, दु:खाचा भार असते. खर... तर कविता जगण्याचा दृष्टीकोण बदलून टाकते.मनातील भावनांना अलवार कागदावर उमटविण्याची ऊर्मी प्रदान करते.

मराठीतील सुरूवातीची काव्ये म्हणजे संतकाव्ये, भक्तिकाव्ये आणि लोककाव्ये आहेत. कवी मुकुंदराज यांना मराठीचे आद्यकवी म्हणून संबोधले जाते. त्यांनी विवेकसिंधू हा काव्यग्रंथ लिहिला आहे.मराठी भाषेत संतकाव्य मोठ्या प्रमाणात लिहिले गेले आहे आणि त्यातून अंधश्रध्दा,अनिष्ठ प्रथा यावर प्रहार करत समाजजागृतीचे कार्य मोठ्याप्रमाणावर झाले आहेत. अंगाई, अभंग, आर्या, ओवी, कणिका, खंडकाव्य, विडंबन, विनोदी कविता, श्लोक, साकी, सुनीत, हायकू असे परंपरागत काव्य प्रकार आढळून येतात. काळ जसजसा पुढे जातो तसतसे काही नविन काव्यप्रकार साहित्यात दाखल झाले असल्याचे नाकारता येत नाही. चारोळी हा काव्य प्रकार आजही प्रसिध्द आहे.



शब्दांच भावस्पर्शी चिंतन म्हणजे कविता,खरच... सोपं नसतं एखाद्या कोऱ्या कागदावर असं काही मांडणं ज्यात सर्व भाव उमटून दिसावेत.अगदि मोजक्याच शब्दात भावनेचा ओलावा काळजापर्यंत भिडावा,आणि शब्दांनी फेर धरुन मनाचा ठाव घ्यावा.प्रत्येकासाठी कवितेचे वेगवेगळे अर्थ असतात.खर तर मनातील दुःख व्यक्त करण्याचा तो साधा सरळ मार्ग आणि सोपा मार्ग असतो...कोणी लिहून हसतात, तर कोणी रडून लिहितात... फरक एवढाच असतो.कविता हृदयातून कागदावर आपोआप मांडली जाते.साहित्यातला सर्वश्रेष्ठ प्रकार म्हणजे कविता,कविता ही फार थोड्या अवकाशात खूप काही व्यक्त करु शकते.

भावना आणि कल्पनांना व्यक्त करणारे ते एक सशक्त माध्यम आहे.जगाला एकापेक्षा एक अजरामर कलाकृती बहाल करणा-या कविंचा गौरव करण्यासाठी युनोस्कोने जागतीक काव्य दिनाची २१ मार्च १९९९ रोजी पॅरिस परिषदेतकविता दिवसाचीघोषणा केली.तेव्हापासून प्रत्येक वर्ष एका महान कविला बहाल केला जातो.रसिकांच्या अंतकरणात आशावादाचे बीज पेरणारी कविताच असते. संमिश्र भावनांची स्पष्ट अभिव्यक्ती म्हणजे कविता. कविता काय असते?ती समजण्यासाठी रसिक मन असाव लागत. आणि ते प्रत्येकाजवळ नसत.जागतिक कविता दिन साजरा करण्यामागच उद्दिष्ट म्हणजे कवितेच्या अभिव्यक्तीव्दारे भाषीक विविधतेला समर्थन देणे.तसेच लुप्त झालेल्या भाषांना पुन्नरजिवन बहाल करणे हा त्यामागचा उद्देश आहे.

जगातील सर्व देशांमध्ये या दिवशी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. कवितांच्या मैफलींना रंग चढतो. सांस्कृतिक आणि कला संस्थांमध्ये, लेखक वाचन, परिसंवाद आणि संमेलने आयोजित केली जा-तात, जी मान्यताप्राप्त कवींच्या कार्याला समर्पित असतात. जेव्हा एखाद्या कवितेतील शब्दांचा स्पर्श अंगावर शह-ारे आणतो, तेव्हा समजून घ्यायची की ती कविता तुम च्यापर्यंत पोहचली,काळजात रुजली.अगदी काळजाच्या दाराला जाऊन भिडली...पण एक मात्र नक्की कविता कधीच लिहिली नाही जात ती हृदयातून कागदावर आ-पोआप उतरली जाते.जगाला एका पेक्षा एक मौल्यवान अजरामर काव्य कला कृती प्रदान करणाऱ्या सर्व कवींना गौरविण्याचा हा दिवस. कविता भरभरुन जगणाऱ्या सर्वांना जागतिक कवीता दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

उधळून दे तुफान सगळं
काळजामध्ये साचलेलं
प्रेम कर भिल्लासारखं
बाणावरती खोचलेलं
_कुसुमाग्रज

**-रुपाली वागरे/वैद्य**
नांदेड
मो. ९८६०२७६२४१

# भटके-विमुक्त समाजाला मुख्य प्रवाहात आणणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी -प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन

**नांदेड (प्रतिनिधी)-** भटके-विमुक्त समाजाचे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण योगदान असून, ब्रिटिशांनी लागू केलेल्या क्रिमिनल ट्राइब्स ॲक्टमुळे या समाजावर मोठा अन्याय झाला. ३१ ऑगस्ट, १९५२ रोजी या समाजाला या कायद्याच्या जोखडातून मुक्त करण्यात आले. मात्र, स्वातंत्र्यानंतरही या समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. भटके-विमुक्त समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याची जबाबदारी केवळ शासनाची नसून प्रत्येक नागरिकाची आहे, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी केले.

भटके-विमुक्त गौरव दिनानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि भटके-विमुक्त विकास परिषद, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात 'भटके-विमुक्त समाज: इतिहास, शिक्षण, विकास व सक्षमीकरण' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत अध्यक्षीय समारोपात डॉ. महाजन बोलत होते.



कार्यक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांच्या समवेत विचार मंचावर कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, प्रमुख वक्ते भटके-विमुक्त विकास परिषद, लातूरचे कार्यवाह नरसिंग झरे, पालावरील शाळा, छत्रपती संभाजीनगरचे प्रकल्प समन्वयक राजेंद्र मेहता तसेच नांदेडचे इतर मागास-बहुजन कल्याण अधिकारी उमेश मोरे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, संयोजन समितीत राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. मारोती गायकवाड, सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. प्रमोद लोणारकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. सुनिता पाटील यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. महाजन म्हणाले की, भटके-विमुक्त समाजाने देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि स्वातंत्र्याच्या इतिहासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. मात्र, ऐतिहासिक परिस्थितीमुळे हा समाज बराच काळ विकासाच्या प्रवाहापासून दूर राहिला. शासनाने या समाजाच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना आणि उपक्रम राबविले आहेत. तथापि, योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि त्यांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. शिक्षण, रोजगार, कौशल्यविकास, सामाजिक सुरक्षा आणि मूलभूत सुविधा यांच्या माध्यमातून या समाजाला सक्षम करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

या कार्यशाळेत भटके-विमुक्त विकास परिषद, लातूरचे कार्यवाह नरसिंग झरे, पालावरील शाळा, छत्रपती संभाजीनगरचे प्रकल्प समन्वयक राजेंद्र मेहता तसेच नांदेडचे इतर मागास-बहुजन कल्याण अधिकारी उमेश मोरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून मार्गदर्शन केले. भटके-विमुक्त समाजाच्या इतिहासासोबतच शिक्षण, विकास, शासनाच्या विविध योजना आणि सक्षमीकरणाच्या संधी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. राजपालसिंह चिखलीकर यांनी केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. मारोती गायकवाड यांनी केले तर कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी डॉ. प्रमोद लोणारकर आणि सुनिता पाटील यांनी उपस्थितींचे आभार मानले. कार्यशाळेला विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच भटके-विमुक्त समाजाच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या विविध संस्था व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. भटके-विमुक्त समाजाच्या इतिहासाची जाणीव, त्यांच्या प्रश्नांचे आकलन आणि त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज या भूमिकेवर कार्यशाळेत विशेष भर देण्यात आला.

# सिडको आरोग्य केंद्रात तीन तास डॉक्टर गायब, काँग्रेसच्या ठिय्या आंदोलनानंतर डॉक्टरांची हजेरी



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)-** महानगरपालिकेच्या सिडको आरोग्य केंद्रात रुग्ण सेवेचा भोंगळ कारभार सुरू असून, डॉक्टर गैरहजर राहण्याची बाब नित्याची झाली आहे. दरम्यान मंगळवार दि. १ सप्टेंबर रोजी तब्बल तीन तास झाले तरी डॉक्टर उपलब्ध होत नसल्याने सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटी अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांच्या नेतृत्वात काँग्रेस शिष्टमंडळाने आरोग्य केंद्रास भेट देत जोपर्यंत डॉक्टर येत नाहीत तोपर्यंत ठिय्या आंदोलन करण्याचा पावित्रा घेत आंदोलन केले.

दरम्यान तासाभरानंतर डॉ. गुंडाळे हे उपस्थित झाले. रुग्ण तपासणी पूर्ण होईपर्यंत आरोग्य केंद्र सुरू ठेवण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर काँग्रेसने ठिय्या आंदोलन मागे घेतले.

महानगरपालिकेच्या सिडको आरोग्य केंद्रातील भोंगळ कारभाराबद्दल तक्रारी येत असल्याने सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या शिष्टमंडळाने मंगळवार, दि. १ सप्टेंबर रोजी आरोग्य केंद्रास भेट दिली. या दरम्यान साडेआठ वाजता सुरू झालेल्या दवाखान्यात अकरा वाजले असताना देखील डॉक्टर उपलब्ध नसल्याने रुग्ण रांगेत ताटकळत बसल्याची बाब निदर्शनास आली. दरम्यान बापूसाहेब पाटील यांनी फोनवरून वरिष्ठ अधिकाऱ्यांना बोलून जोपर्यंत डॉक्टर हजर होत नाहीत तोपर्यंत आरोग्य केंद्राबाहेर ठिय्या आंदोलन करण्याचा पवित्रा घेत आंदोलन केले. दरम्यान एका तासानंतर डॉ. गुंडाळे हे हजर झाले. यानंतर जोपर्यंत सर्व रुग्णांची तपासणी होत नाही तोपर्यंत आरोग्य केंद्र बंद करणार नाही असे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेतले. यावेळी सिडको काँग्रेस अध्यक्ष बापूसाहेब पाटील, महिला ब्लॉक अध्यक्षा ज्योती कदम, अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष नुरोद्दीन शेख, लतिफ शेख, एनएसयूआयचे सचिन कानोडे, सोशल मीडिया अध्यक्ष नईम शेख, जाफर शेख, कलावती चव्हाण, गोणारकरताई आदींसह इतर काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

सिडको प्रभाग क्र. २० च्या एका नगरसेवक प्रतिनिधीने याच आरोग्य केंद्रात वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळे तज्ज्ञ डॉक्टर आणण्याचे आम्ही काम केले अशी माहिती समाज माध्यमातून दिली, मात्र ते देखील फेक असल्याचे स्पष्ट झाले. 'दरम्यान नगरसेवक प्रतिनिधी जबाब दो, रुग्णालयात त्वचारोग तज्ज्ञ का नाहीत' असे फलक दाखवून काँग्रेसने खोट्या आश्वासनाचा देखील निषेध केला.

# नांदेड पोलीस दलातील १३ अधिकारी, अंमलदारांना निरोप

**नांदेड (प्रतिनिधी)-** जिल्हा पोलीस दलात कर्तव्यनिष्ठेने आणि प्रामाणिकपणे सेवा बजावून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या १३ अधिकारी व अंमलदारांचा निरोप समारंभ सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी मंथन हॉल, पोलीस अधीक्षक कार्यालय येथे उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला.

हा सोहळा पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन आणि अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या हस्ते पार पडला. यावेळी सेवानिवृत्त अधिकारी-अंमलदारांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला व पुढील आयुष्यासाठी निरोगी व सुखी जीवनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

पोलीस दलात सेवा बजावताना या अधिकारी-अंमलदारांनी कायदा व सुव्यवस्था, नागरिकांची सुरक्षा, गुन्हे प्रतिबंध व तपास, वाहतूक नियमन यामध्ये मोलाचे योगदान दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.



जगन पवार- पो. नि., वाहतूक शाखा इतवारा सुधाकर राठोड- पोउपनि, नियंत्रण कक्ष, कैलास पवार- ग्रेड पोउपनि, अर्धापूर, राम कराड- ग्रेड पोउपनि, भोकर, बंडू गवई- ग्रेड पोउपनि, मुदखेड, पांडुरंग जानापुरे- ग्रेड पोउपनि, मुख्यालय माधव कदम- सपोउपनि, लोहा, यशवंत देशमुख- सपोउपनि, मुख्यालय बालाजी जाधव- सपोउपनि, उमरी, शिवाजी राजगीरे- हवालदार भाग्यनगर, संजय लगडे- हवालदार, मुख्यालय, गुणवंत जाधव- पोशि, मुख्यालय, तानाजी भोसले- पोशि, उमरी हे १३ अधिकारी-अंमलदारांना निरोप देण्यात आला आहे.

यावेळी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी आपल्या सेवाकाळातील अनुभव कथन करत सहकाऱ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन पोलीस कल्याण विभागाचे पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार, जनसंपर्क विभागातील हवालदार हनमंत पोतदार, अंमलदार मारोती कांबळे, सविता भिमलवाड यांनी केले तर सूत्रसंचालन सपोनि रियाज शेख यांनी केले.

# मतदार यादी तपासा; त्रुटी असल्यास मुदतीत दुरुस्ती करा -श्रावण पाटील भिलवंडे

## ३० सप्टेंबरपर्यंत दावे-हरकती दाखल करण्याचे आवाहन; नावासाठी फॉर्म ६, वगळण्यासाठी ७ तर दुरुस्तीसाठी फॉर्म ८

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)-** नायगाव विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झाली असून, नागरिकांनी यादीत आपले नाव, पत्ता व अन्य तपशील तपासून घ्यावेत. त्रुटी आढळल्यास मुदतीत दुरुस्ती करून घ्यावी, असे आवाहन भाजपचे नेते तथा नायगाव पंचायत समितीचे माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांनी केले.



प्रारूप यादीसंदर्भातील दावे व हरकती ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत दाखल करता येणार आहेत. नवीन नाव नोंदणीसाठी फॉर्म ६, नाव वगळण्यासाठी फॉर्म ७, तर नाव, पत्ता किंवा अन्य तपशिलातील दुरुस्तीसाठी फॉर्म ८ भरता येणार आहे. १ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र युवक-युवतींनाही फॉर्म ६ द्वारे नाव नोंदणी करता येईल.

दावे-हरकती संबंधित सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात किंवा मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे दाखल करता येणार आहेत.

# जुना कौठा श्रीपादनगर येथे शिवपुराण कथा सोहळ्याचे आयोजन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)-** श्री दत्त, श्री नर्मदेश्वर महादेव, श्री स्वामी समर्थ मंदिर येथे श्री शिव महापुराण कथा महोत्सव ३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबर दरम्यान आयोजित करण्यात आला असून, दररोज दुपारी ३ ते ६ हभप प्रवीण शास्त्री केळीकर यांच्या सुमधुर वाणीतून शिवपुराण कथेचे सादरीकरण होणार आहे.

याप्रसंगी हभप प्रवीण शास्त्री केळीकर यांच्या सुमधुर वाणीतून व सोहम संगीत संच यांच्या संगीतमय साथ संगतीने शिवपुराण कथेचे सादरीकरण होणार आहे. या कथेला सहकुटूंब, सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक कृष्णा बालाजीराव काळे व मंदिर विश्वस्त समितीचे अध्यक्ष विठ्ठलराव काळे व दत्तमंदिर समिती श्रीपाद नगर कौठा नांदेड यांनी एका प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

# भाजप अल्पसंख्याक कार्यकारिणी सदस्यपदी सय्यद गौस

**मुदखेड (प्रतिनिधी)-** महाराष्ट्र प्रदेश भाजप अल्पसंख्याक कार्यकारिणी सदस्यपदी सय्यद गौस सय्यद बाबू उर्फ जीएस यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



सय्यद गौस सय्यद बाबू गेल्या अनेक वर्षापासून भाजपच्या जिल्हा व तालुका स्तरावर प्रभावीपणे कार्य करत संघटन मजबुतीत मोठा सक्रिय सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या या पक्ष संघटनेतील कार्याची दखल घेऊन त्यांची निवड जाहीर करण्यात आली असून, त्यांनी पक्षश्रेष्ठींनी टाकलेल्या विश्वासास पात्र राहून पक्ष संघटन वाढविण्याची ग्वाही दिली.

# जिल्हा सहकारी बँकेच्या निवृत्त कर्मचाऱ्यांचा २० सप्टेंबर रोजी नांदेड येथे गेट-टुगेदर स्नेहमेळावा

**नांदेड (प्रतिनिधी)-** शेतकरी व ग्रामीण भागाच्या विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सेवेत अनेक वर्षे प्रामाणिकपणे कार्य करून निवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा स्नेहमेळावा (गेट-टुगेदर) दि. २० सप्टेंबर रोजी नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला नावारूपाला आणण्यात संचालक मंडळा-बरोबरच अधिकारी व कर्मचाऱ्यांचेही मोलाचे योगदान राहिले आहे. बँकेच्या प्रगतीसाठी विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडणाऱ्या निवृत्त कर्मचाऱ्यांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून निवृत्त कर्मचारी मित्रांना एकमेकांची गाठभेट होणार असून जुन्या आठवणींना उजाळा मिळणार आहे. तसेच परस्परांतील स्नेहबंध अधिक दृढ होऊन नवीन ऋणानुबंध निर्माण होतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

नांदेड येथील ताज पाटील येथे आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यास निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

अधिक संपर्क व नाव नोंदणी ७३५०७२३४९९, ९४०३३ ३०७७३ या दूरध्वनी क्रमांकावर करावी, असेही कळविण्यात आले आहे.

# गिरीष गायकवाड यांना पीएच.डी. प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी)-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने गिरीष सुभाष गायकवाड यांना पर्यावरणशास्त्र विषयातील डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी पदवीसाठी पात्र घोषित करण्यात आले आहे.



त्यांनी Comparative Study of Padegaon and Naregaon Municipal Dumping Sites and Its Impact on Ground Water and Soil Quality या विषयावर प्रबंध सादर केला होता. त्यांच्या या यशाबद्दल मित्रपरिवारासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# मुस्लीम विद्यार्थ्यांनी आंबेडकरवादी मिशनचा लाभ घेऊन अधिकारी बनावे -दीपक कदम

**नांदेड (प्रतिनिधी)-** मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांनी मुख्य प्रवाहात सहभागी होण्यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करावी व त्याकरिता आंबेडकरवादी मिशनच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा आणि देशसेवा व सामाजिक सेवेसाठी पुढे यावे, असे आवाहन आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी केले.

नांदेड येथे मोस अकॅडमीच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांच्या या ऐतिहासिक कार्यक्रमाला पाच हजारांपेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.



या कार्यक्रमात मौलाना सैयद अब्दुल्ला, प्रा. जलील, मोहम्मद आमिर, प्रा. टिळक, शिवप्रसाद जाधव, शेर अली, शेख मुख्तार, फरहान देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पालक व विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती होती.

आंबेडकरवादी मिशनच्या दिल्ली येथील देशातील सुप्रसिद्ध next ias क्लासच्या सुविधा विद्यार्थ्यांना निशुल्क उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याचा लाभ मुस्लीम विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहनही दीपक कदम यांनी केले. आंबेडकरवादी मिशनतर्फे मुंबई येथील हाज हाऊस, नांदेड येथील उर्दू घर येथील ग्रंथालयासाठी अडीच लाख रुपयांचे ग्रंथ देण्यात आले.

# 'त्या' अनामत रकमेशी आमचा संबंध नाही!

- स्वतःचा भ्रष्टाचार लपविण्यासाठी सभापती-सचिवांकडून बिनबुडाचे आरोप
- किनवट बाजार समितीच्या संचालकांचे प्रत्युत्तर

**किनवट (प्रतिनिधी)-** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमधून ९ संचालकांनी लाखो रुपये उचल केल्याच्या कारणावरून सहायक निबंधकांनी त्या संचालकांना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या होत्या. त्यावर संचालकांनी त्या अनामत रकमेशी आमचा दुरान्वयानेही संबंध नसल्याचे स्पष्टीकरण देतानाच स्वत:चा भ्रष्टाचार लपविण्यासाठी सभापती व सचिवाकडून बिनबुडाचे आरोप केले जात असत्याचेही संचालकांनी स्पष्ट केले आहे.

किनवट बाजार समितीच्या ९ संचालकांनी बाजार समितीतून लाखो रुपये अनामत म्हणून उचल केल्याप्रकरणी त्या ९ संचालकांना सहायक निबंधकांनी दि. २५ ऑगस्ट रोजी कारणे दाखवा नोटिसा बजावल्या होत्या. यावर लेखी स्पष्टीकरणात बाजार समितीचे ज्येष्ठ संचालक सोपानराव केंद्रे, उपसभापती राहुल नाईक, संचालक बालाजी बामणे यांच्यासह इतर संचालकांनी म्हटले आहे की, बाजार समितीने आम्हाला कधीच कोणतीही 'अनामत'रक्कम दिली नाही. सदर रक्कम आम्ही उचल केल्याची कसलीही माहिती बाजार समितीने आम्हाला दिली नाही. आम्हाला नोटीस प्राप्त झाल्यावरच ही बाब अवगत झाली. त्यामुळे सदर व्यवहाराबाबत आमची पूर्वसंमती, माहिती अथवा प्रत्यक्ष सहभाग असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आमच्या नावे कीर्द व कॅशबुकमध्ये अनामत रक्कम उचलल्याची नोंद असल्याचे सांगण्यात आले आहे. तथापि, आम्ही प्रत्यक्ष रक्कम घेतली नसल्याने सदर नोंदी ह्या आमच्या प्रत्यक्ष व्यवहारावर आधारित नसून, खोट्या व बनावट आहेत. सभापती गजानन मुंडे व सचिव रवी राठोड यांनी स्वतःचा भ्रष्टाचार लपविण्यासाठीच आम्ही अनामत रकमा उचलल्याचा कांगावा केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी व प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणीही संचालकांनी केली आहे.

**सभापतींसह इतर दोघा संचालकांनाही नोटिसा**

सभापती गजानन मुंडे यांच्यासह इतर दोघा संचालकांनाही सहायक निबंधकांनी नोटिसा बजावल्या होत्या. परंतु सभापती गजानन मुंडे यांनी ही माहिती लपवून ठेवल्याचा आरोप करत संचालकांनी सभापतींच्या नावे २७ लाख रुपयांच्यावर अनामत उचल केल्याची माहिती दिली.

**आणखी एक घोटाळा?**

किनवट बाजार समितीच्या तब्बल दीड कोटी रुपयांच्या मुदत ठेवीचा घोटाळा गेल्या चार महिन्यांपासून सभापती - संचालक यांच्यातील आरोप - प्रत्यारोपातून गाजत असतानाच सभापती मुंडे व सचिव रवी राठोड यांनी संचालक मंडळाला अंधारात ठेवून संगनमताने दि.३१ जुलै २०२६ रोजी किनवट बाजार समितीच्या जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या बोधडी बु. शाखेतील शेष खात्यातून ३ लाख ७५ हजार रुपये उचल केल्याचा आरोप संचालकांनी केला आहे. याबाबत संचालकांनी संबंधित बँकेकडे विचारणा केली असता, शाखाधिकाऱ्यांनी वरील बाबीला लेखी पुष्टी दिल्याचे संचालकांनी सांगितले.

# भटके-विमुक्त जमातीतील विद्यार्थ्यांसाठी विविध प्रमाणपत्रांचे विशेष शिबीर

## हस्सापूर येथील आश्रमशाळेत भटके-विमुक्त दिवस उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)-** भटके-विमुक्त जमातीतील विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली विविध शासकीय प्रमाणपत्रे सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी हस्सापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्राथमिक आश्रमशाळा तसेच जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ३१ ऑगस्ट हा भटके-विमुक्त दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित मान्यवरांना क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे समग्र वाङ्मय हा ग्रंथ भेट देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पांडुरंग काकडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार (महसूल) सुनील माचेवाड उपस्थित होते.

याप्रसंगी कवी अशोक कुबडे यांनी भटके-विमुक्त जमातीचा इतिहास, सामाजिक परिस्थिती, शैक्षणिक प्रगती तसेच विद्यार्थ्यांसमोरील विविध संधी व आव्हाने याबाबत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.



विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून उपलब्ध संधींचा लाभ घेऊन आपल्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

नायब तहसीलदार सुनील माचेवाड यांनी विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रासह आवश्यक विविध शासकीय प्रमाणपत्रे मिळविण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे तसेच शासकीय सेवा व योजनांचा लाभ घेण्यासाठी करावयाची कार्यवाही याबाबत मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना आवश्यक प्रमाणपत्रे मिळवून देण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्राचे चालक गणेश मॅकल यांच्या माध्यमातून आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रमाणपत्रे काढताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर होऊन शासकीय प्रक्रियेत सुलभता निर्माण होणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माध्यमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक एस. एल. गायकवाड तसेच प्राथमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व्ही. आर. कदम यांचे सहकार्य लाभले. श्रीमती एस. एस. शेळके यांनी स्वागतगीत सादर करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थितांचे आभार डी. आर. कळसे यांनी मानले.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

## थर्मामीटरमध्ये ताप नसतानाही अंगाला भरतेय हुडहुडी?

### ॲनिमियापासून थायरॉईडपर्यंत असू शकतात ही कारणे...

**थर्मामीटरमध्ये तापमान सामान्य असतानाही वारंवार थंडी वाजणे किंवा शरीराला हुडहुडी भरणे याकडे अनेक जण हवामान किंवा अशक्तपणामुळे होत असलेली साधी समस्या म्हणून दुर्लक्ष करतात. मात्र, सामान्य तापमानातही वारंवार अंगाला कंप सुटत असेल, तर त्यामागे ॲनिमिया, हायपोथायरॉईडिझम, रक्तातील साखर कमी होणे किंवा जीवनसत्त्व बी-१२ ची कमतरता यांसारखी कारणे असू शकतात. थंडीच्या वातावरणात शरीराचे तापमान टिकवून ठेवण्यासाठी स्नायू वेगाने आकुंचन-पसरण पावतात. त्यातून अतिरिक्त उष्णता निर्माण होते आणि शरीराला कंप सुटतो. ही शरीराची नैसर्गिक प्रतिक्रिया आहे. मात्र, बाहेरचे वातावरण सामान्य असतानाही वारंवार थंडी वाजत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष न करता त्यामागील कारण शोधणे आवश्यक आहे.**



» शरीराला कंप का सुटतो? : शरीराला कंप सुटणे ही शरीराची नैसर्गिक संरक्षणात्मक प्रतिक्रिया आहे. स्नायू वेगाने आकुंचन आणि प्रसरण पावून शरीरात उष्णता निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. सामान्यतः थंड वातावरणात शरीराचे तापमान टिकवून ठेवण्यासाठी ही प्रक्रिया घडते. मात्र, शरीरातील चयापचय क्रिया, रक्तातील साखरेचे प्रमाण, संप्रेरकांचे संतुलन, रक्ताभिसरण किंवा मज्जासंस्थेच्या कार्यावर परिणाम झाल्यासदेखील थंडी वाजणे आणि शरीराला कंप सुटणे अशी लक्षणे दिसू शकतात.

» ॲनिमियामुळेही थंडी वाजू शकते : शरीरात पुरेशा प्रमाणात हिमोग्लोबिन किंवा लाल रक्तपेशी नसतील, तर त्या अवस्थेला ॲनिमिया (रक्तक्षय) असे म्हणतात. हिमोग्लोबिनचे प्रमुख कार्य शरीराच्या विविध भागांपर्यंत प्राणवायू पोहोचवणे हे आहे. ॲनिमियामध्ये थकवा, अशक्तपणा, धाप लागणे, डोकेदुखी आणि त्वचा फिकट पडणे अशी लक्षणे दिसू शकतात. विशेषतः लोहाच्या कमतरतेमुळे होणारा ॲनिमिया मोठ्या प्रमाणावर आढळतो. लोह हे हिमोग्लोबिनच्या निर्मितीसाठी आवश्यक असते. ॲनिमियासोबत शरीरात अशक्तपणा किंवा ऊर्जेची कमतरता असल्यास काही व्यक्तींना सतत थंडी वाजणे किंवा हात-पाय गार पडणे अशी तक्रारही जाणवू शकते.

» हायपोथायरॉईडिझममध्ये थंडी अधिक का वाजते? : थायरॉईड ग्रंथी शरीरातील चयापचय क्रिया आणि ऊर्जेचा वापर नियंत्रित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. थायरॉईड संप्रेरकांचे उत्पादन कमी झाल्यास हायपोथायरॉईडिझमची स्थिती निर्माण होऊ शकते. या अवस्थेत इतर व्यक्तींच्या तुलनेत संबंधित व्यक्तीला थंडी अधिक जाणवू शकते. यासोबत वजन वाढणे, सतत थकवा जाणवणे, बद्धकोष्ठता, त्वचा कोरडी पडणे, केस पातळ होणे, स्नायू किंवा सांध्यांमध्ये वेदना आणि हृदयाचे ठोके मंदावणे अशी लक्षणेही दिसू शकतात.

» रक्तातील साखर कमी झाल्यास शरीराला कंप सुटतो : रक्तातील साखरेचे प्रमाण अचानक कमी झाल्यास शरीराला कंप सुटणे, घाम येणे, तीव्र भूक लागणे, अशक्तपणा, चक्कर येणे, अस्वस्थता किंवा हृदयाचे ठोके वेगाने वाढणे अशी लक्षणे दिसू शकतात. या अवस्थेला हायपोग्लायसेमिया म्हणतात. विशेषतः मधुमेहासाठी काही औषधे किंवा इन्सुलिन घेणाऱ्या व्यक्तींमध्ये रक्तातील साखर कमी होण्याचा धोका अधिक असू शकतो. दीर्घकाळ उपाशी राहणे, अतिप्रमाणात मद्यपान करणे तसेच काही आरोग्यविषयक समस्या यांचाही रक्तातील साखर कमी होण्याशी संबंध असू शकतो.

» जीवनसत्त्व बी-१२ची कमतराही कारणीभूत : जीवनसत्त्व बी-१२ हे लाल रक्तपेशींच्या निर्मितीसह मज्जासंस्थेच्या सामान्य कार्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याची कमतरता झाल्यास अशक्तपणा, थकवा, धाप लागणे, हृदयाचे ठोके जाणवणे, भूक मंदावणे आणि डोकेदुखी अशी लक्षणे दिसू शकतात. बी-१२ ची कमतरता दीर्घकाळ राहिल्यास हात-पायांत मुंग्या येणे, बधिरपणा, स्नायूंची कमजोरी, शरीराचा तोल जाणे तसेच स्मरणशक्ती किंवा मानसिक स्थितीशी संबंधित बदलही होऊ शकतात.

» चिंता किंवा घाबरल्यामुळेही शरीराला कंप सुटू शकतो : प्रत्येक वेळी शरीराला कंप सुटण्यामागे संसर्ग किंवा पोषणाची कमतरता असेलच असे नाही. मानसिक ताण, तीव्र चिंता किंवा पॅनिक अटॅकमुळेही शरीराला थंडी वाजून कंप सुटू शकतो. अशा वेळी शरीरातील ताण- प्रतिक्रिया सक्रिय होते. परिणामी थरथर कापणे, थंडी वाजणे, घाम येणे, हृदयाचे ठोके वाढणे, चक्कर येणे, श्वास घेण्यास त्रास होणे, हात-पायांत मुंग्या येणे आणि तीव्र भीती वाटणे अशी लक्षणे दिसू शकतात.

### वारंवार कंप सुटत असेल तर दुर्लक्ष करू नका


ताप नसतानाही अधूनमधून थंडी वाजणे किंवा शरीराला कंप सुटणे ही नेहमीच गंभीर आजाराची लक्षणे असतील असे नाही. थंड वातावरण, मानसिक ताण किंवा शरीराची तात्पुरती प्रतिक्रिया यामुळेही असे होऊ शकते. मात्र, ही समस्या वारंवार होत असेल, दीर्घकाळ टिकत असेल किंवा त्यासोबत सतत थकवा, वजनात बदल, चक्कर येणे, धाप लागणे, हात-पाय बधिर होणे किंवा अन्य लक्षणे दिसत असतील, तर वैद्यकीय तपासणी करून घेणे आवश्यक आहे. ॲनिमिया, हायपोथायरॉईडिझम, रक्तातील साखर कमी होणे, जीवनसत्त्व बी-१२ची कमतरता किंवा तीव्र चिंता यांसारखी कारणे तपासण्यासाठी डॉक्टर आवश्यक त्या चाचण्या सुचवू शकतात. कारण समजून न घेता स्वतःहून जीवनसत्त्वांची पूरक औषधे किंवा इतर औषधे घेण्यापेक्षा डॉक्टरांचा सल्ला घेणे अधिक सुरक्षित आहे.



## नस्य उपचाराचे अनेक फायदे

### नस्य उपचार म्हणजे काय? तो कुणासाठी योग्य अन् कुणी टाळावा?

**आयुर्वेदातील पंचकर्म उपचारपद्धतीमध्ये नस्य कर्माला महत्त्वाचे स्थान आहे. नाकावाटे औषधी तेल किंवा अन्य औषधी द्रव्ये देण्याची ही पद्धत आहे. आयुर्वेदात डोके, नाक, कान, घसा आणि संबंधित तक्रारींसाठी नस्य उपचाराचा उपयोग केला जातो. मात्र, प्रत्येक व्यक्तीसाठी हा उपचार योग्य असेलच असे नाही. नस्य उपचार योग्य पद्धतीने, योग्य व्यक्तीच्या देखरेखीखाली आणि रुग्णाची प्रकृती लक्षात घेऊन केला तरच त्याचा अपेक्षित फायदा होऊ शकतो. चुकीच्या पद्धतीने किंवा स्वतःहून नस्य केल्यास त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे हा उपचार घेण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.**



### नस्य पंचकर्म म्हणजे काय?

आयुर्वेदानुसार नस्य म्हणजे नाकावाटे औषधी द्रव्ये देण्याची प्रक्रिया. डोके, नाक, कान आणि घशाशी संबंधित काही तक्रारींसाठी आयुर्वेदिक उपचारपद्धतीमध्ये याचा वापर केला जातो. नस्य उपचाराची प्रक्रिया केवळ नाकात तेल टाकण्यापुरती मर्यादित नसते. उपचाराच्या पद्धतीनुसार त्यापूर्वी आणि नंतर काही प्रक्रिया केल्या जाऊ शकतात.

### उपचाराची सामान्य प्रक्रिया

» अभ्यंग : उपचारापूर्वी चेहरा, मान किंवा संबंधित भागाला तेलाने हलक्या हाताने मालिश केली जाऊ शकते.

» स्वेदन : त्यानंतर सौम्य वाफ देण्याची प्रक्रिया केली जाऊ शकते.

» औषधी द्रव्यांचा वापर : तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार नाकावाटे औषधी तेल किंवा अन्य औषधी द्रव्ये दिली जातात.

» उपचारानंतरची काळजी : प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विश्रांती घेणे किंवा अन्य आवश्यक सूचना दिल्या जाऊ शकतात. आयुर्वेदात नस्याचा उपयोग सायनसशी संबंधित तक्रारी, डोकेदुखी, मायग्रेन आणि डोके-नाक-घशाशी संबंधित काही समस्यांमध्ये केला जातो. मात्र, त्याच्या परिणामकारकतेबाबत प्रत्येक आजारासाठी पुरावे समान प्रमाणात उपलब्ध आहेत असे मानता येत नाही. त्यामुळे वैद्यकीय निदान आणि तज्ज्ञांचा सल्ला महत्त्वाचा आहे.

### नस्य उपचार कधी तुलनेने सुरक्षित मानला जातो?



नस्य उपचाराची गरज असल्यास तो पात्र आणि प्रशिक्षित आयुर्वेद तज्ज्ञांच्या देखरेखीखाली, विश्वसनीय उपचार केंद्रात, रुग्णाची प्रकृती आणि आरोग्यस्थिती तपासल्यानंतर, योग्य औषधी द्रव्य आणि योग्य पद्धतीने केला जाणे अधिक सुरक्षित ठरते.

### नस्य उपचार प्रत्येकासाठी योग्य नसतो...

» गर्भावस्था : गर्भावस्था ही अत्यंत संवेदनशील अवस्था आहे. त्यामुळे या काळात कोणतीही पंचकर्म प्रक्रिया स्वतःहून करू नये. नस्याची आवश्यकता असल्यास स्त्रीरोगतज्ज्ञ आणि पात्र आयुर्वेद तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

» मासिक पाळीच्या काळात : मासिक पाळीच्या काळात, विशेषतः रक्तस्राव जास्त होत असल्यास, नस्य उपचार पुढे ढकलण्याचा सल्ला दिला जाऊ शकतो. अशा परिस्थितीत व्यक्तीची प्रकृती आणि लक्षणे लक्षात घेऊन निर्णय घेतला जातो.

» ताप, तीव्र सर्दी किंवा संसर्ग : जास्त ताप, तीव्र सर्दी-खोकला, नाक किंवा घशाचा संसर्ग किंवा सायनसची तीव्र समस्या असल्यास नस्य करण्यापूर्वी त्या स्थितीवर उपचार करणे आवश्यक ठरू शकते. अशा वेळी स्वतःहून नस्य करणे टाळावे.

» नाक किंवा मेंदूची अलीकडील शस्त्रक्रिया : नाकाची शस्त्रक्रिया, नाकातील पडदा दुरुस्त करण्याची शस्त्रक्रिया, मेंदूची शस्त्रक्रिया किंवा डोक्याला झालेली दुखापत अशा परिस्थितीत नस्य उपचार करण्यापूर्वी संबंधित डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

» तीव्र स्वरूपाचा मायग्रेन : मायग्रेनचा त्रास अचानक तीव्र झाला असेल किंवा डोकेदुखीचे स्वरूप नेहमीपेक्षा वेगळे असेल, तर प्रथम त्यामागील कारण शोधणे महत्त्वाचे आहे. अशा वेळी नस्य उपचार पुढे ढकलला जाऊ शकतो.

» अनियंत्रित उच्च रक्तदाब : रक्तदाब मोठ्या प्रमाणात वाढलेला आणि नियंत्रणात नसल्यास कोणताही अतिरिक्त उपचार सुरू करण्यापूर्वी रक्तदाब नियंत्रित करणे आवश्यक आहे. नस्य उपचाराचा निर्णयही तज्ज्ञांच्या तपासणीनंतरच घ्यावा.

» अशक्त किंवा अतिवृद्ध व्यक्ती : वयस्कर आणि अत्यंत अशक्त व्यक्तींमध्ये कोणतीही पंचकर्म प्रक्रिया त्यांच्या शारीरिक क्षमतेनुसार करणे आवश्यक असते. त्यामुळे अशा व्यक्तींनी तज्ज्ञांच्या तपासणीनंतरच नस्य उपचार घ्यावा.

» लहान मुले : लहान मुलांमध्ये नाकातील संरचना अधिक नाजूक असू शकते. त्यामुळे विशेषतः कमी वयाच्या मुलांना स्वतःहून नस्य देणे टाळावे. मुलांसाठी हा उपचार आवश्यक आहे की नाही, हे बालरोगतज्ज्ञ आणि पात्र आयुर्वेद तज्ज्ञांच्या सल्ल्याने ठरवावे.

» रक्तस्रावाशी संबंधित समस्या : वारंवार नाकातून रक्त येणे, रक्त गोठण्यासंबंधी विकार किंवा प्लेटलेटचे प्रमाण कमी असणे अशा समस्या असल्यास नस्य उपचार करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे.

» तीव्र चिंता किंवा घाबरण्याची प्रवृत्ती : अत्यंत घाबरणे, पॅनिक अटॅक किंवा बंद जागेची भीती यांसारख्या समस्या असलेल्या व्यक्तींना उपचारादरम्यान अस्वस्थता वाढू शकते. त्यामुळे उपचार सुरू करण्यापूर्वी तज्ज्ञांना या समस्यांची माहिती देणे आवश्यक आहे.

### घरच्या घरी नस्य करणे कितपत योग्य?

सामाजिक माध्यमांवर घरच्या घरी नाकात तेल टाकण्याच्या किंवा नस्य करण्याच्या अनेक पद्धती सांगितल्या जातात. मात्र, प्रत्येक व्यक्तीसाठी एकच औषधी तेल किंवा एकच पद्धत योग्य असेलच असे नाही. रुग्णाची प्रकृती, सध्याची आरोग्यस्थिती, तक्रारी, वापरायचे औषधी द्रव्य, त्याचे प्रमाण, योग्य वेळ आणि उपचाराची पद्धत यांचा विचार करणे आवश्यक आहे. चुकीच्या पद्धतीने नस्य केल्यास नाकात जळजळ होणे, डोकेदुखी, कफ वाढणे, चक्कर येणे किंवा अन्य त्रास होऊ शकतो. त्यामुळे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाशिवाय नस्य उपचार करू नये.

### कोणती लक्षणे दिसल्यास त्वरित थांबावे?

तीव्र डोकेदुखी, दृष्टी धूसर होणे किंवा पाहताना त्रास होणे, सतत नाकातून रक्त येणे, वारंवार उलट्या होणे, नाकात किंवा घशात तीव्र जळजळ, तीव्र चक्कर किंवा अस्वस्थता अशी लक्षणे दिसल्यास वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. नस्य हे आयुर्वेदातील एक उपचारकर्म आहे; मात्र ते सर्व आजारांवर रामबाण उपाय किंवा प्रत्येक व्यक्तीसाठी सुरक्षित उपचार आहे, असे मानणे योग्य नाही. कोणतीही पंचकर्म प्रक्रिया करण्यापूर्वी रुग्णाची प्रकृती, आजाराचे स्वरूप आणि सध्याची आरोग्यस्थिती विचारात घेणे आवश्यक आहे. विशेषतः गर्भावस्था, तीव्र आजार, अलीकडील शस्त्रक्रिया, रक्तस्रावाचे विकार, अनियंत्रित रक्तदाब किंवा अत्यंत अशक्तपणा असल्यास स्वतःहून नस्य करू नये. आयुर्वेदिक उपचारही तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालीच घेतल्यास अधिक सुरक्षितपणे करता येतात.

## टूथब्रश किती दिवसांनी बदलावा?

**दररोज दातांची स्वच्छता राखण्यासाठी टूथब्रशचा वापर केला जातो. मात्र, एकच टूथब्रश दीर्घकाळ वापरत राहिल्यास त्याचे तंतू झिजून पसरू लागतात आणि त्यांची स्वच्छता करण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे तोंडाचे आरोग्यही प्रभावित होऊ शकते. दंततज्ज्ञांच्या मते, साधारणपणे दर तीन ते चार महिन्यांनी टूथब्रश बदलणे आवश्यक आहे. मात्र, त्यापूर्वीच ब्रशचे तंतू वाकले, पसरले किंवा खराब झाले असतील, तर लगेच नवीन टूथब्रश वापरणे योग्य ठरते. दररोज सकाळी आणि रात्री दात घासणे ही तोंडाच्या स्वच्छतेची अत्यंत महत्त्वाची सवय आहे. मात्र, आपण वापरत असलेला टूथब्रश शेवटचा कधी बदलला, याचा विचार अनेक जण करत नाहीत. काही जण महिनोनमहिने, तर काही वेळा वर्षानुवर्षे एकच टूथब्रश वापरत राहतात. तज्ज्ञांच्या मते, टूथब्रश बदलण्याचा कालावधी केवळ तो किती जुना आहे यावर अवलंबून नसतो. ब्रशच्या तंतूंची अवस्था, तो वापरण्याची पद्धत आणि व्यक्तीच्या तोंडाच्या आरोग्याची स्थितीही महत्त्वाची असते.**



» टूथब्रश किती वेळाने बदलावा? : अमेरिकन डेंटल असोसिएशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, साधारणपणे दर तीन ते चार महिन्यांनी टूथब्रश बदलावा. हा नियम साध्या तसेच विद्युत टूथब्रशसाठी लागू होतो. मात्र, विद्युत टूथब्रशमध्ये संपूर्ण उपकरण बदलण्याची गरज नसते; सामान्यतः त्याचे ब्रश हेड बदलले जाते. दिवसातून दोन वेळा आणि प्रत्येक वेळी सुमारे दोन मिनिटे दात घासल्यास काही महिन्यांत ब्रशचे तंतू हळूहळू त्यांचा मूळ आकार आणि लवचिकता गमावू लागतात. त्यामुळे दातांवर साचलेला प्लाक प्रभावीपणे दूर करण्याची ब्रशची क्षमता कमी होऊ शकते.

» केवळ टूथब्रश बदलणे पुरेसे नाही... : तोंडाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नियमितपणे टूथब्रश बदलणे महत्त्वाचे आहे; मात्र, ही संपूर्ण तोंडाच्या स्वच्छतेच्या दिनचर्येचा केवळ एक भाग आहे. दंततज्ज्ञांच्या मते, दिवसातून दोन वेळा फ्लोराइडयुक्त टूथपेस्टने सुमारे दोन मिनिटे दात घासणे आवश्यक आहे. दातांच्या मधील भागाची स्वच्छताही तितकीच महत्त्वाची आहे. कारण टूथब्रश आणि टूथपेस्ट प्रत्येक ठिकाणी प्रभावीपणे पोहोचू शकत नाहीत.

» हिरड्यांतून रक्त येत असेल तर सावधान! : वारंवार हिरड्यांतून रक्त येणे, सतत तोंडातून दुर्गंधी येणे, दात संवेदनशील होणे किंवा दात दुखणे अशा समस्या असतील, तर केवळ टूथब्रश बदलून थांबू नये. अशा वेळी दंतवैद्यांकडून तपासणी करून घेणे आवश्यक आहे.

» हा नियम लक्षात ठेवा : दर तीन ते चार महिन्यांनी टूथब्रश बदला. त्यापूर्वीच तंतू पसरले, वाकले, तुटले किंवा मोठ्या प्रमाणात झिजले असतील, तर त्वरित नवीन ब्रश वापरा. आजारी पडल्यानंतर प्रत्येक वेळी टूथब्रश बदलणे अनिवार्य आहे, असे नाही. मात्र, टूथब्रश इतर व्यक्तीसोबत कधीही सामायिक करू नये आणि तो स्वच्छ धुऊन व्यवस्थित वाळवून ठेवावा. विद्युत टूथब्रश वापरणाऱ्यांनी संपूर्ण उपकरणाऐवजी आवश्यकतेनुसार त्याचे ब्रश हेड बदलावे. नियमित दात घासणे, दातांमधील स्वच्छता राखणे आणि योग्य वेळी टूथब्रश बदलणे या तीन गोष्टी तोंडाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी महत्त्वाच्या आहेत.

### टूथब्रश बदलण्याची वेळ आली आहे, हे कसे ओळखाल?

» ब्रशचे तंतू पसरले असतील : तंतू सरळ न राहता वेगवेगळ्या दिशांना पसरले असतील, तर ब्रश झिजल्याचे हे लक्षण आहे.

» तंतू वाकले असतील : दात घासताना जास्त दाब दिल्यामुळे किंवा सततच्या वापरामुळे तंतू वाकू शकतात.

» तंतू तुटले किंवा मोठ्या प्रमाणात झिजले असतील : अशा तंतूंमुळे दातांची प्रभावी स्वच्छता होत नाही.

» ब्रशचे हेड खराब किंवा अस्वच्छ दिसत असेल : योग्य प्रकारे धुऊन वाळवल्यानंतरही ब्रशची अवस्था खराब दिसत असेल, तर तो बदलणे योग्य.

» तीन ते चार महिने पूर्ण झाले असतील : ब्रश बाहेरून ठीक दिसत असला तरी या कालावधीनंतर नवीन ब्रश वापरण्याचा सल्ला दिला जातो. म्हणून एक सोपा नियम लक्षात ठेवा. तीन ते चार महिन्यांनी टूथब्रश बदला; मात्र त्यापूर्वीच तंतू खराब झाले असतील, तर त्याच वेळी नवीन ब्रश घ्या.

# जरांगे पाटलांचे उपोषण सोडवण्यासाठी ठोस निर्णय घ्या; बजरंग सोनवणेंचं मुख्यमंत्र्यांना पत्र



**मुंबई(प्रतिनिधी)**–मराठा आरक्षणाच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणास बसलेले मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने तातडीने त्यांच्याशी संवाद साधावा आणि उपोषण सोडवण्यासाठी ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक पत्र पाठवले आहे.

खासदार सोनवणे यांनी पत्रात नमूद केले आहे की, मनोज जरांगे पाटील हे २९ ऑगस्ट २०२६ पासून पुन्हा एकदा उपोषणाला बसले आहेत. मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांना वारंवार आंदोलनाचा खडतर मार्ग स्वीकारावा लागत आहे. सततच्या उपोषणा-मुळे त्यांच्या आरोग्यावर गंभीर आणि विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वैद्यकीय आणि प्रशासकीय पातळीवर त्यांच्या प्रकृतीकडे प्राधान्याने लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे.

आपल्या पत्रात खासदारांनी स्पष्ट केले की, हे आंदोलन केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नसून, संपूर्ण महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या तीव्र भावना या आंदोलनाशी जोडलेल्या आहेत. समाजातील अस्वस्थता दिवसेंदिवस वाढत असून, परिस्थिती अधिक संवेदनशील बनत चालली आहे.

राज्य शासनाने या प्रश्नाकडे केवळ एक प्रशासकीय बाब म्हणून न पाहता पूर्ण गांभीर्याने आणि संवेदनशीलतेने पाहावे, असेही पत्रात म्हटले आहे. मुख्यमंत्र्यांनी स्वतः पुढाकार घेऊन जरांगे पाटील यांच्याशी थेट संवाद साधावा. तसेच, शासनाने आपली भूमिका स्पष्ट करून कायदेशीर तोडगा काढावा आणि उपोषण त्वरित सोडवण्यासाठी आवश्यक ती सर्व प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करावी, अशी विनंती खासदार सोनवणे यांनी केली आहे.

# तुकाराम मुंढेंच्या निर्णयाला सरकारची स्थगिती; सुटे तेल विक्रीला १ वर्षांची सूट

**मुंबई(प्रतिनिधी)**–राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी कारवायाचा धडाका लावला असून काही दिवसांपूर्वी त्यांनी खाद्यतेल विक्रीकडे आपला मोर्चा वळवला होता. खाद्यतेलातील भेसळ आणि गुणवत्तापूर्ण दर्जा कायम ठेवण्यासाठी त्यांनी सुटे खाद्यतेल विक्रीला राज्यात बंदी घातली होती. मात्र, या निर्णयानंतर तेली समाजाने पारंपरिक व्यवसाय असल्याचे सांगत या निर्णयास विरोध केला. तसेच, सुटे तेल विक्री करणारे बहुसंख्य गरीब ग्राहक असल्याचंही त्यांनी म्हटलं होतं. त्याच पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत खाद्य तेल महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यामध्ये, तुकाराम मुंढेंच्या खाद्य तेल विक्रीसंदर्भातील निर्णयास स्थगिती देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खाद्यतेल विक्री संदर्भातील तुकाराम मुंढेंच्या निर्णयाला स्थगिती दिली असून सुटे तेल विक्रीला १ वर्षांची सूट देण्यात आली आहे. मात्र, यासह खाद्यतेल महासंघाच्या पदाधिकाऱ्यांना काही महत्त्वाच्या सूचनाही करण्यात आल्या आहेत. ''अन्न व औषध प्रशासनाच्या अखत्यारीत सुटे तेल विक्रीसंदर्भात २०११ मध्ये हा कायदा झाला आहे. कारण, सुटे खाद्यतेल विक्रीध्ये गुणवत्ता हा महत्वाचा निकष आहे. मात्र, अनेक गरीब माणसं सुटे तेल घेतात, त्यामुळे कायदा आणि सामान्य माणूस यातून मार्ग काढला पाहिजे. त्याच अनुषंगाने सुटे खाद्यतेल विक्रीसाठी तात्पुरती १ वर्षाची सूट देण्यात येत'' असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी म्हटले. मात्र, यानंतर मुदतवाढ मिळणार नाही, कायदा पाळावाच लागेल.

## Change In Name

MY OLD NAME IS SAMDANI GULAM YAJDANI GULAM WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME GULAM SAMDANI GULAM YAJDANI SHAIKH HENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME PLEASE CONSIDER THE SAME.

ADDRESS: H NO 2/5/425/15, SAMEERA BAGH COLONY, WAGHI ROAD, NANDED, TQ,. DIST. NANDED - 431601

## Change In Name

MY OLD NAME IS SAYYED RASUL WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAMERASULRAHEMANSAYYADHENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE CONSIDER THE SAME.

ADDRESS: 3-3-103, BAGAMAR GALLI, NEAR POLICE STATION THANE, MUDKHED, TQ. MUDKHED, DIST. NANDED - 431806

## Change In Name

MY OLD NAME IS PATHAN HUSENKHAN NABIKHAN WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME HUSAIN KHAN NABI KHAN PATHAN HENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE CONSIDER THE SAME. SIGN BY-HUSAIN KHAN NABI KHAN PATHAN. ADDRESS: PLOT NO 47 GULSHAN COLONY GALLI NO 14, NANDED-431605 MO. NO. 7620005206

# 'स्वच्छ कार्यालयनिरोगी, सकारात्मक व कार्यक्षम वातावरण' मोहिमेला प्रारंभ

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**–कार्यालयीन परिसर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवण्यासोबतच अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये स्वच्छतेची भावना रुजविण्यासाठी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून 'स्वच्छ कार्यालयनिरोगी, सकारात्मक आणि कार्यक्षम वातावरण' या मोहिमेला आज प्रारंभ झाला. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या परिसरात स्वतः स्वच्छता उपक्रमात सहभागी होत मोहिमेची सुरुवात केली.

'स्वच्छ कार्यालय ही केवळ जबाबदारी नसून सकारात्मक आणि कार्यक्षम कार्यसंस्कृतीची सुरुवात आहे,' असे सांगून विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. कार्यालयीन परिसर स्वच्छ व निरोगी ठेवण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या उपक्रमांतर्गत दर सोमवारी सकाळी १० ते ११ या वेळेत एक तास श्रमदान करण्यात येणार आहे. सर्व अधिकारी आपल्या अधिनस्त कर्मचारीवर्गासह या उपक्रमात सहभागी होणार असून, कार्यालयीन परिसर, सभोवतालची जागा तसेच कामकाजाच्या ठिकाणी स्वच्छता राखण्यावर भर देण्यात येणार आहे.

'स्वच्छता हीच सेवा' या भावनेतून राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेमुळे कार्यालयीन परिसर अधिक स्वच्छ, सुंदर व प्रसन्न होण्यास मदत होणार आहे. स्वच्छ व सकारात्मक वातावरणामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढण्यासोबतच विविध कामांसाठी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांनाही प्रसन्न वातावरणाचा अनुभव मिळणार आहे.

ही मोहीम केवळ एकदाच न राबविता नियमितपणे दर सोमवारी एक तास श्रमदानातून राबविण्यात येणार आहे. याशिवाय कार्यालयीन स्वच्छता व परिसराचे सुशोभीकरण यासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार आहेत. प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपल्या कार्यस्थळाची स्वच्छता, नीटनेटकेपणा व परिसराची निगा राखण्याची जबाबदारी स्वीकारावी, असा संदेश या मोहिमेतून देण्यात आला.

**अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्स्फुर्त सहभाग**

मोहिमेच्या प्रारंभी विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेत कार्यालयीन परिसराची स्वच्छता केली.

# भारतात टाटा बनवणार टँकविरोधी मिसाईल सिस्टीम जॅव्हलिन

**नवी दिल्ली(प्रतिनिधी)**–भारताने अमेरिकेकडून टँकविरोधी मिसाईल सिस्टीम एफजीएम-१४८ जॅव्हलिन खरेदी करण्याचा करार केला आहे. भारताने जॅव्हलिन सिस्टीमसाठी प्रस्ताव आणि स्वीकृती पत्रावर स्वाक्षऱ्याही केल्या आहेत. आता टाटा एडवांस्ड सिस्टिम्स लिमिटेड आणि जॅव्हलिन जॉइंट व्हेंचर (जेजेवी) यांनी भारतात या सिस्टीमच्या निर्मितीसाठी एका करारावर स्वाक्षरी केली आहे. हा करार भारतीय डिफेन्स इंडस्ट्रीला मोठी संधी देईल आणि इंडो-पॅसिफिकसाठी प्रादेशिक स्थैर्य मजबूत करेल.

## Change In Name

My Old Name is **ABDUL RAQEEB** which now I am changing as New Name **ABDUL RAQEEB ABDUL BAQUI** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address-TAHURA COLONY CHAITANYA NAGAR NANDED**

## Change In Name

My Old Name is **SUMIYYA TABASSUM** which now I am changing as New Name **SUMIYYA TABASSUM ABDUL RAQEEB** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address-TAHURA COLONY CHAITANYA NAGAR, NANDED**

## जाहीर प्रगटन

मौजे खुपसरवाडी ग्रामपंचायत ता. जि. नांदेड हद्दीतील शेत गट नं. ४७ पैकी शिवदत्त पार्कमधील प्लॉट नं. ५ ज्याची साईज लांबी दक्षिण उत्तर ४० फुट म्हणजे १२.१९ मीटर व रुंदी पूर्व-पश्चिम २७ फुट म्हणजे ८.२२ मीटर ज्याचे एकूण क्षेत्रफळ १०८० चौरस फुट म्हणजे १००.३७ चौरस मीटरचा प्लॉट विलास लोकडोजी डक रा. पिंपळगाव निमजी ता. जि. नांदेड यांचेकडून गोपाल संभाजीराव हंबर्डे रा. विष्णुपुरी नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून, बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**प्लॉटची चतु:सीमा–**

पूर्वेस - प्लॉट नं. ४

पश्चिमेस -प्लॉट नं. ४१

दक्षिणेस -गुलाब खान यांचे शेत

उत्तरेस - २० फुट रुंद रोड.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉटबद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत गोपाल संभाजीराव हंबर्डे यांच्या नावाने करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
गोपाल संभाजीराव हंबर्डे
रा. विष्णुपुरी ता. जि. नांदेड

## Change In Name

My Old Name is **SHAIKH SHAHID SHAFIK** which now I am changing as New Name **SHAIKH SHAID SHAIKH SHAFIQUE** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address-Babar Colony Parbhani Maharashtra-431401**
**MO. NO. 9561409321**

**ॲड. हरीकिशन एल. चौधरी यांनी दिनांक ३१.०८.२०२६ रोजी दिलेल्या जाहीर आक्षेपाचा खुलासा**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार नामे पवन द्वारकादास भुतडा, रा. रायगड नगर, नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

हे की, माझे पक्षकार यांनी दामोधर पि. वामन डांगे, वयः ४७ वर्षे, धंदा : शेती, रा. वैजापूर ता.जि.हिंगोली यांच्या मालकी व ताब्यातील नांदेड मनपा हद्दीतील मौजे असदुल्लाबाद येथील शेत सर्वे नं. ५, सिटीएस नं. ९९७६ पैकी एक प्लॉट ज्याचा प्लॉट नं. ४ आहे. जे अकृषिक (एनए) झालेला आहे. ज्याचा मनपा क्रं. १-१६-४२२/१ जुना पिन नंबर ४०२०३०७१५४४ आहे. ज्याची लांबी पूर्व-पश्चिम ६२ फुट व रुंदी दक्षिण-उत्तर ३६ फुट असून ज्याचे एकूण क्षेत्रफळ २२३२ चौ. फुट म्हणजे २०७.४३ चौ. मीटर असून ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. पूर्वेस : २० फुट रुंद रस्ता आहे. पश्चिमेस : रायगड सोसायटी आहे. दक्षिणेस : प्लॉट नं. ०३ आहे, उत्तरेस : प्लॉट नं.०५ आहे. या प्लॉट बाबत खरेदीचा करार केलेला आहे. माझे पक्षकाराचे सहकारी मिर्झा खलील बेग पि. गुलाब बेग रा. चुना भट्टी देगलूर नाका, नांदेड मो. ९३७३६५१७१७ हे त्यांच्या वैयक्तीक कामासाठी पोलीस ठाणे हदगाव येथे गेले असता त्या वेळेस तेथे कार्यरत असलेले स.पो.नि. श्री संकेत दिघे यांनी चर्चा करीत असतांना उपरोक्त प्लॉटबाबत त्यांना विचारणा केल्याने त्यांनी सदरचा प्लॉट खरेदी करण्याची हमी दिली. त्यानुसार त्यांनी निर्देशीत केल्या प्रमाणे अंबाळा फाट्यावर असलेल्या ढाब्यावर माझे पक्षकार व इतर व्यक्ती तसेच या प्लॉटचे संबंधित मालक यांनी आपापसात चर्चा करुन माझ्या पक्षकाराकडून बयानापोटी काही रक्कम घेतली. या वेळी स.पो.नि. संकेत दिघे हजर होते. त्यानंतर नांदेड येथे सौदाचिठ्ठी करण्याचे ठरले होते. परंतु उपरोक्त प्लॉटबाबत भाऊकीचा वाद न्याय प्रविष्ठ असल्याने परत त्यांनी या प्लॉटच्या खरेदी विक्रीस अडीअडथळा करु नये म्हणून मा. न्यायालयाकडून मनाई हुकुम आदेश प्राप्त केल्यानंतर खरेदीखत करण्याचे ठरले आहे. त्यामुळे दिनांक ११.०४.२०२६ रोजी माझे पक्षकार आणि दामोदर डांगे व त्यांचे जावई यांनी माझ्या कार्यालयात येऊन चर्चेअंती दिवाणी दाखल करण्यासाठी सर्व कागदपत्राची पुर्तता केली. या वेळी मिर्झा खलील बेग यांनी या प्रकरणासाठी लागणारे खर्च म्हणून रु.२५०००/- अदा केले आहे. त्यानुसार नांदेड येथील न्यायालयात नि.दि.दा.क्रं.१७५/२०२६ दाखल करण्यात आलेला असून न्यायप्रविष्ठ आहे. त्यानंतर दामोदर डांगे यांचे जावई आणि इतर काही व्यक्ती यांनी येऊन माझ्या पक्षकारास सौदाचिठ्ठीपोटी काही रक्कमेची मागणी केली. माझे पक्षकार हे रक्कम देण्यास तयार होते. परंतु सौदाचिठ्ठी तयार करीत असतांना त्यातील काही नियम व अटी त्यांना मान्य नसल्यामुळे सौदाचिठ्ठी लिखित स्वरुपात होऊ शकली नाही. दामोधर डांगे व त्यांचे सहकारी यांनी न्यायालयाचा मनाईहुकुम प्राप्त झाल्यानंतर खरेदीखत करण्याचे मान्य केले होते. दिनांक १५.०८.२०२६ रोजी उपरोक्त प्लॉटवर काही अज्ञात इसम साफसफाई करीत असल्याचे दिसून आल्याने माझ्या पक्षकाराने त्यांना विचारणा केली असता सदरील व्यवहाराबाबत कळाले. त्यावेळी माझ्या पक्षकाराने त्यांना मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. माझे पक्षकार हे उपरोक्त प्लॉटचा सौदा करुन त्यांना काही रक्कम दिलेली असूनही त्यांनी माझ्या पक्षकारास कसलीही कल्पना न देता त्यांचे परभारे सदरचा प्लॉट इतर त्रयस्त इसमांना विक्री करण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्यामुळे माझ्या पक्षकारावर अन्याय झालेला आहे. म्हणून माझ्या पक्षकाराने दैनिक प्रजावाणी या वृत्तपत्रामध्ये दिनांक २९.०८.२०२६ रोजी जाहीर प्रगटन देऊन आक्षेप घेतलेला आहे. यामध्ये कसलेही चुकीचे वर्णन करण्यात आलेले नाही. माझ्या पक्षकाराकडून बयाना पोटी रक्कम घेऊन खरेदीखत करुन देण्यास टाळाटाळ करुन सदर प्लॉटवर त्रयस्त इसमाचा बोजा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे.

तरी आपणास व सर्व संबंधितास या जाहीर प्रगटनाच्या खुलास्या आधारे सुचित करण्यात येते की, उपरोक्त उल्लेखीत प्लॉटबाबत माझ्या पक्षकाराशी सल्लामसलत केल्याशिवाय कोणीही करु नये, माझे पक्षकार सदरचा प्लॉट हे ठरल्याप्रमाणे खरेदीखत करुन घेण्यास तयार आहे.

सबब हा जाहीर प्रगटनाचा खुलासा
दिनांक : ३१.०८.२०२६

| मार्फत | जाहीर प्रगटन देणार |
|---|---|
| ॲड. ए. डी. लाडे | पवन द्वारकादास भुतडा |
| रा. जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड | रा. रायगड नगर, नांदेड |
| मो. ८६६८७६१७१६ | मो. ९३७३६५६५१७ |

# सोन्याच्या दरात घसरण

**मुंबई (प्रतिनिधी)**–सोन्याच्या दरात सलग पाचव्या दिवशी रु. २,७०० ची घसरण झाली असून, दिल्लीतील ९९.९% शुद्ध सोन्याचा भाव रु. १,५८,२०० प्रति १० ग्रॅमवर आला आहे. पाच दिवसांत सोने रु. ८,९०० स्वस्त झाले.

सोन्याच्या दरातील घसरण मंगळवारीही कायम राहिली. राजधानी दिल्लीत ९९.९ टक्के शुद्धतेच्या सोन्याचा भाव सलग पाचव्या दिवशी रु. २,७०० ने घसरून रु. १,५८,२०० प्रति १० ग्रॅम झाला. जागतिक बाजारातील सोन्याच्या मोठ्या विक्रीमुळे देशांतर्गत बाजारावरही दबाव निर्माण झाला आहे.

स्थानिक व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार सोमवारी सोन्याचा भाव रु. १,६०,९०० प्रति १० ग्रॅम होता. मंगळवारी तो रु. २,७०० ने कमी झाला. जवळपास दोन आठवड्यांतील हा निचांकी दर आहे. यापूर्वी १९ ऑगस्टला सोन्याचा भाव रु. १,५८,००० प्रति १० ग्रॅम होता.

## जाहीर प्रगटन

मा. तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी लोहा यांच्या न्यायालयात

प्रकरण-जन्म/मृत्यू नोंद घेणे बाबत

अर्ज क्र. ....    दिनांक-२७/७/२०२६

अर्जदाराचे नाव-संभाजी प्रभू काळे, अर्जदार यांच्याशी असलेले नाते व नाव-आजोबा, दत्ता गंगाराम काळे, अर्जदार यांच्या विरुद्ध ग्रामसेवक/मुख्याधिकारी न. प. ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय वडगाव, मृत्यू दिनांक-१६/४/२००४, मृत्यू स्थळ-वडगाव, जन्म/मृत्यू नोंदणी अधिकारी-ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय वडगाव.

ज्या अर्थी उपरोक्त वर नमूद अर्जदार यांनी न्यायालयात हजर राहून जन्म/मृत्यू नोंदणी कायदा २०२३ शासन निर्णय १८ मार्च २०२५ व १ डिसेंबर २०२५ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांचे नातेवाईक यांच्या मृत्यूची नोंद घेण्यासाठी ग्रामसेवक ग्रामपंचायत/मुख्याधिकारी नगरपरिषद येथे नोंद उपलब्ध नाही. त्या अर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांचे नातेवाईक यांच्या मृत्यूची नोंद वर नमूद ठिकाणी घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत या न्यायालयात स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहित कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक ३१/८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**तहसीलदार**
**लोहा**

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान

# कुंटूरकर शुगर ॲन्ड ॲग्रो प्रा. लि.

**मोहननगर, मु. पो. कुंटूर, ता. नायगांव, जि. नांदेड - ४३१७०९**

**संपर्क: प्रशासन विभाग श्री. अभय पवार- मो. नं. ८४८४८०९८४९**

(Whatspp) & B©-_ob : kunturkarsugarpogmail.com

जा. क्र/प्रशासन/२५४/२०२६-२७    दि. १ सप्टेंबर २०२६

## हंगामी कामाची टेंडर नोटीस

**गाळप हंगाम सन २०२६-२७ करिता साखर कारखान्यातील खालील नमूद हंगामी कामे ठेकेदारी पद्धतीने देण्यात येणार आहेत. त्यासाठी इच्छुक व पात्र ठेकेदारांकडून विहीत नमुन्यातील टेंडर मागविण्यात येत आहेत. टेंडर फॉर्म सादर करण्याची मुदत : दि. ०२ सप्टेंबर २०२६ ते दि. १२ सप्टेंबर २०२६, कार्यालयीन वेळेत प्रशासन विभागात दाखल करावेत.**

■ टेंडर फॉर्मची किंमत : रु.१,०००/- + जी.एस.टी (रुपये एक हजार फक्त)

■ टेंडर सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) रु.५००००/-(रुपये पन्नास हजार फक्त)

■ टेंडर कामाचे नाव १) केनयार्ड साफ सफाई, गव्हाण काम, केन कॅरिअर व फिडर टेबलखालील साफसफाई करणे २) बगॅस काम- बॉयलरला बगॅस पुरवठा करणे, बेलिंग मशीन चालवून बगॅस बेल्स तयार करणे, अतिरिक्त बगॅस ट्रॅक्टरद्वारे लोटणे इत्यादी ३) बॉयलर राख व वेट स्क्रबर राख उचलणे ४) प्रेसमड वाहतूक करणे ५) प्रोसेससाठी आवश्यक केमिकल्स, चुना व गंधक् वाहतूक करणे व चुन्याची निवळी तयार करणे ६) शुगर हाऊस व शुगर गोदामातील साखर हमालीचे काम.

■ **अटी व शती :**

■ प्रत्येक कामासाठी स्वतंत्र टेंडर फॉर्म असेल. टेंडर फॉर्मची किंमत रु.१,०००/-+जी.एस.टी (रुपये एक हजार फक्त) अकाउंट विभागात भरून प्रशासन विभागातून टेंडर फॉर्म घ्यावा. टेंडर फॉर्मची किंमत कोणत्याही परिस्थितीत परत केली जाणार नाही.

■ टेंडर फॉर्म दाखल करताना संबंधित कामासाठी वरील प्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) अकाउंट विभागात भरणे बंधनकारक आहे. सुरक्षा अनामत रक्कम भरल्याशिवाय टेंडर फॉर्म स्वीकारला जाणार नाही. टेंडरची कामे चर्चेनुसार अंतिम झाल्यानंतर, अपात्र बाद ठरलेल्या/टेंडरधारकांनी त्यांची सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) परत मिळण्यासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक राहील.

■ आवश्यक वाटल्यास संबंधित ठेकेदारांना चर्चेसाठी बोलाविण्यात येईल.

■ कारखाना व्यवस्थापनाला कोणतेही टेंडर कारण न देता स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा पूर्ण अधिकार राहील.

**जनरल मॅनेजर**    **चेअरमन तथा कार्यकारी संचालक**

## ई-निविदा सुचना क्र. सन ०५/२०२६-२०२७
## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
## जिल्हा परिषद धाराशिव

या विभागांतर्गत जल जीवन मिशन अंतर्गत मौ. गोजवाडा ता. वाशी व अंदोरा ता. कळंब येथील पाणी पुरवठा करणे या कामांची ई निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०१/०९/२०२६ ते २६/०९/२०२६ या कालावधीसाठी प्रसिध्द करण्यात आले आहे. सर्व संबंधित निवीदाधारकांनी वरील संकेतस्थळावर ई निविदा ऑनलाईन सादर करावी.

**(सुनिल सु. कटकधोंड)**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद धाराशिव**

**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# खा. राहुल गांधी यांच्यावरील अॅट्रॉसिटी गुन्ह्याविरोधात नांदेडात काँग्रेसचा एल्गार

## महात्मा फुले चौकात सरकारविरोधात घोषणाबाजी





**नांदेड (प्रतिनिधी)-** काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या अवमान प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी करणारे खासदार राहुल गांधी यांच्यावरच राजकीय सूडबुद्धीने अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आल्याच्या निषेधार्थ नांदेड जिल्हा काँग्रेसने मंगळवारी महात्मा फुले चौकात तीव्र निदर्शने केली.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या सभेनंतर विरोधकांनी सभास्थळी गोमूत्र शिंपडून शुद्धीकरण केल्याचा प्रकार घडला होता. या असंविधानिक कृत्यावर राहुल गांधी यांनी कडक शब्दांत टीका करत दोषींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. मात्र त्यांच्या टीकेचा विपर्यास करत उलट राहुल गांधींवरच अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

या कारवाईमुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मंगळवारी सकाळी महात्मा फुले चौकात जमलेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजप सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत हा खोटा गुन्हा तात्काळ मागे घेण्याची मागणी केली. गुन्हा रद्द न झाल्यास रस्त्यावर उतरून अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

कार्याध्यक्ष महेश देशमुख तरोडेकर म्हणाले, खरगे यांच्या सभेनंतर गोमूत्र शिंपडणे हा मनुवादी विचार आहे. काँग्रेसला मिळणाऱ्या प्रतिसादामुळे सूडबुद्धीचे राजकारण केले जात आहे, पण याविरोधात आमचे आंदोलन सुरूच राहील.

या आंदोलनात प्रदेश महासचिव सुरेंद्र घोडजकर, डॉ. रेखा चव्हाण, राजेश पावडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीमः महिनाभरात १७२० गुन्हे दाखल, १८ कोटी १५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

## डीआयजी शहाजी उमाप यांच्या पथकाची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)-** पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दिनांक १ ते ३१ ऑगस्ट, २०२६ दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात अवैध दारू, गुटखा, मटका, जुगार, अंमली पदार्थ, घातक शस्त्रे इत्यादी विरोधी मोहीम उघडली. त्यानुसार नांदेड परिक्षेत्रात राबविण्यात आलेल्या सदर मोहिमेदरम्यान, गुटखा व्यावसायिकांविरुद्ध कलम १२३ भारतीय न्याय संहिते अंतर्गत ३९, महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत ३७५, महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये १०१९, शस्त्र अधिनियमान्वये ५५, तर इतर अधिनियमाखाली २३२, अशा एकूण १७२० कारवाया करुन २७५३ इसमांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून १८ कोटी १५ लाख २१ हजार ४७२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाईत पोलीस उप-महानिरीक्षक कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या नांदेड जिल्ह्यातील वाहेगांव येथील वाळू उपसा, परभणी जिल्ह्यातील दैठणा येथील जुगार अड्डा, हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ येथील गुटखा, तसेच लातूर जिल्ह्यातील अहमदपूर, मुरुड व लातूर शहरातील मटका जुगार केसेसचा समावेश आहे.

उपरोक्त मोहिमेत पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयातील विशेष पथकासोबतच नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर येथील पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखानी संबंधित जिल्ह्यातील पोलीस ठाणी व स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी सहभाग घेतला. सदरच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी परिक्षेत्रातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

**१ सप्टेंबरपासून परिक्षेत्रात अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम ३**

नांदेड परिक्षेत्रात, सप्टेंबर महिन्यात अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम ३ राबविण्यात येणार आहे. सदर मोहिमेअंतर्गत परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांमध्ये गुटखा, मटका जुगार, दारू, अंमली पदार्थ, अवैध वाळू उपसा व वाहतूक, वेश्या व्यवसाय, जीवनाश्यक वस्तू अधिनियम, अवैध प्रवासी वाहतूक इत्यादी विरुद्ध प्रभावी कारवाई करण्यात येणार आहे. सदर मोहीम ही संपूर्ण सप्टेंबर महिनाभर व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असून, संबंधित पोलीस अधिकारी व अंमलदारांना अवैध व्यवसायांविरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# गणेशोत्सवासाठी अधिकृत वीज जोडणी घ्या; महावितरणचे गणेश मंडळांना आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)-** यंदाचा गणेशोत्सव निर्विघ्न आणि सुरक्षित वातावरणात साजरा करण्यासाठी सर्व गणेशोत्सव मंडळांनी वीज सुरक्षेची योग्य ती खबरदारी घ्यावी, तसेच उत्सव कालावधीत केवळ अधिकृत वीज जोडणीच (वीज कनेक्शन) घ्यावी, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

उत्सवाच्या काळात कोणतीही अप्रिय घटना अथवा दुर्घटना घडू नये याची खबरदारी घ्यावी. श्रीगणेश आगमन आणि विसर्जन मिरवणुकीदरम्यान रस्ते तसेच गल्ली-बोळांतील विजेच्या तारांची (वीज वाहिन्या) उंची लक्षात घेऊनच गणेशमूर्तीची उंची व रथाची रचना निश्चित करावी. त्याचप्रमाणे मंडप आणि रोषणाईसाठी वीज संचाची मांडणी करताना सुरक्षेच्या नियमांचे पालन केले जावे. अपघात टाळण्यासाठी केवळ प्रमाणित आणि कुशल विजेच्या ठेकेदारांकडूनच हे काम करून घ्यावे.

गणेश मंडळांसाठी वीज जोडणी घेण्याची प्रक्रिया महावितरणने अत्यंत सोपी केली आहे. मंडळांना महावितरणच्या अधिकृत मोबाईल अॅप किंवा ऑनलाईन संकेतस्थळावरून अर्ज करून त्वरित तात्पुरती वीज जोडणी मिळवता येणार आहे.

## नांदेड पोलिसांची अवैध व्यवसायांविरुद्ध ‘मास रेड’ मोहीम

# ३२ गुन्हे दाखल, ४४ आरोपींवर कारवाई, ९.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)-** जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार नांदेड जिल्हाभर अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने दिनांक ३१ ऑगस्ट रोजी व्यापक विशेष ‘मास रेड’ मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांनी समन्वयाने एकाच दिवशी शहरी व ग्रामीण भागातील संशयित ठिकाणांवर धाडसत्र राबवून दारूबंदी, मटका, जुगार, गुटखा तसेच इतर बेकायदेशीर व्यवसायांवर प्रभावी कारवाई केली. या विशेष मोहिमेमुळे जिल्ह्यातील अवैध धंद्यांना मोठा आळा बसला आहे.

या विशेष मोहिमेत एकूण ३२ गुन्हे दाखल करण्यात आले असून ४४ आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली. तसेच विविध प्रकारचा एकूण ९ लाख ८० हजार २५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई डॉ. निलाभ रोहन, पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या आदेशाने अपर पोलीस अधीक्षक, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ठाणे प्रभारी अधिकारी व दुय्यम अधिकारी व तेथील पोलीस अंमलदार यांनी सहभाग नोंदवून पार पाडली आहे.

जिल्हा पोलीस नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अशा विशेष मोहिमा यापुढेही सातत्याने राबविणार असून, अवैध व्यवसायांबाबतची माहिती नागरिकांनी निर्भयपणे स्थानिक पोलीस ठाण्यास किंवा डायल ११२ वर देऊन पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# एकटी तरुणी पाहून बलात्कार; नराधमाला ७ वर्षे सक्तमजुरी

**नांदेड (प्रतिनिधी)-** मुदखेड तालुक्यातील मेंडका येथे घरात एकटी असलेल्या तरुणीवर बलात्कार करणाऱ्या आरोपीला नांदेडच्या न्यायालयाने ७ वर्षे सक्तमजुरी आणि १४ हजार ५०० रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे. विशेष पोक्सो न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश बी. यू. चौधरी यांनी हा निकाल दिला.

दि. २६ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी पीडित घरात एकटी असल्याची संधी साधून आरोपीने तिचे तोंड दाबून बळजबरीने अत्याचार केला होता. याप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांनी तपासात पुरावे गोळा करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

सुनावणी दरम्यान अभियोजन पक्षातर्फे ७ साक्षीदार तपासण्यात आले. तपासिक अंमलदार तथा सहायक पोलीस निरीक्षक कमल शिंदे यांचा सूक्ष्म तपास, साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय पुरावे आणि ठोस युक्तिवादाच्या आधारे न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले.

सरकार पक्षातर्फे अॅड. मणिकुमारी बत्तुला (डांगे) यांनी प्रभावी युक्तिवाद करत आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध केला. या निकालामुळे महिलांवरील अत्याचाराच्या प्रकरणात कायदा कठोर असल्याचा संदेश गेला आहे.

# एर्टिगातून गुटख्याची तस्करी; अर्धापूर पोलिसांनी ८.१७ लाखांचा मुद्देमाल पकडला



**नांदेड (प्रतिनिधी)-** नांदेड जिल्ह्यात अवैध गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखू विरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत अर्धापूर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. उड्डाण पुलाजवळ ८ लाख १७ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा आणि वाहन जप्त करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने ही मोहीम सुरू आहे. दि. ३१ ऑगस्ट रोजी प्रभारी अधिकारी महादेव मांजरमकर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पथक पार्डी (म.) शिवारातील टोलनाक्याजवळ पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी संशयित मारुती एर्टिगा (MH-14-EC-4677) येताना दिसली. पंचासमक्ष तपासणी केली असता वाहनात मोठा साठा आढळला. चालकाने त्याचे नाव सय्यद मुक्तार सय्यद रसूल (वय ३४, रा. कानडखेड, ता. पूर्णा, जि. परभणी) असे सांगितले.

पथकाने केसरयुक्त विमल पानमसाला KING PCK- 440 पाकिटे, विमल KING PCK (६ पाऊच)- ४४० पाकिटे, विमल BIG PCK ३३० पाकिटे, प्रिमियम त-१ जर्दा ११०० पाकिटे, ३ लाख १७ हजार २४० रुपयांचा गुटखा, ५ लाखांची ईरटीका कार असा ८ लाख १७ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# नापिकी, कर्जाला कंटाळून तरुण शेतकऱ्याची आत्महत्या



**किनवट (प्रतिनिधी)-** सततची नापिकी आणि डोक्यावर असलेल्या कर्जाच्या बोजाला कंटाळून किनवट तालुक्यातील मौजे धामणधरी येथील एका ३० वर्षीय अल्पभूधारक तरुण शेतकऱ्याने सोमवार, दि. ३१ ऑगस्टच्या सायंकाळी शेतात विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. निखिल दिलीप जाधव असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

निखिल जाधव यांच्याकडे केवळ दीड एकर शेती आहे. मागील काही वर्षांपासून निसर्गाची अवकृपा आणि सतत होत असलेल्या नापिकीमुळे ते आर्थिक संकटात सापडले होते. बँक व सावकारी कर्जाची परतफेड कशी करावी, या विवंचनेत ते गेल्या कित्येक दिवसांपासून मानसिक तणावात होते.दरम्यान, दिनांक ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास निखिल हे शेताकडे फेरफटका मारण्यासाठी जातो असे सांगून घरातून बाहेर पडले. शेतात गेल्यानंतर त्यांनी नैराश्यातून विषारी औषध प्राशन केले.

# ऊस दर जाहीर केल्याशिवाय कारखाने सुरू करू देणार नाही; डॉ. मनूरकरांचा जिल्हाधिकाऱ्यांना इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)-** ऊस गळीत हंगाम २०२६-२७ सुरू होण्यापूर्वी जिल्ह्यातील सर्व साखर कारखानदार आणि शेतकऱ्यांची संयुक्त बैठक जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली घ्यावी, अशी मागणी डॉ. भगवान मनूरकर यांनी निवेदनाद्वारे केली होती. यावरून त्यांनी मंगळवारपासून आंदोलन सुरू केले आहे.

कारखानदार हंगाम सुरू होण्यापूर्वी पहिली उचल व अंतिम दर जाहीर करत नाहीत, त्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. गतवर्षी गाळप झालेल्या उसाचा अंतिम भावही अनेक कारखान्यांनी दिलेला नाही, असे निवेदनात म्हटले आहे.

**प्रमुख मागण्या :** उसाला पहिली उचल ४ हजार रुपये प्रति टन द्यावी. गतवर्षी साखरेचे भाव ५ हजार प्रति क्विंटलवर गेल्याने शेतकऱ्यांना ५०० रुपये प्रति टन वाढीव हप्ता व १००० रुपये अनुदान द्यावे. कारखान्याबाहेर शासकीय वजनकाटे सुरू करून त्याचे वजन ग्राह्य धरावे, जेणेकरून शेतकऱ्यांची लूट थांबेल. FRP व कारखानदार देत असलेल्या दरात तफावत असून रिकव्हरी कमी दाखवून लूट होत आहे, याची गुणवत्ता विभागामार्फत चौकशी करावी. गाळपानंतर १५ दिवसांत पेमेंट अदा करावे या मागण्यांसाठी बैठक न घेतल्यास १ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करून जोपर्यंत दर जाहीर होत नाही, तोपर्यंत जिल्ह्यातील कारखान्यांना ऊसतोड करू देणार नाही, असा इशारा डॉ. मनूरकर यांनी दिला होता.

# हदगावातील ५ घरफोड्या उघड; फरार आरोपी हिंगोली गेट येथून जेरबंद, १.१३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत, एलसीबीची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)-** हदगाव पोलीस ठाणे हद्दीतील घरफोडीच्या गुन्ह्यांतील फरार आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचून नांदेडच्या हिंगोली गेट ब्रिजखाली पकडले. त्याच्याकडून १ लाख १३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, ५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि गोविंद खैरे यांचे पथक फरार आरोपींचा शोध घेत होते. गोपनीय माहितीनुसार हदगाव गु.र.नं. २०५/२०२६ मधील फरार आरोपी शाहरुख ऊर्फ रहिम शेख अबुबकर सिद्दीकी (वय २९, रा. आझाद चौक, हदगाव) हा नांदेड शहरातील हिंगोली गेट ब्रिजखाली येणार असल्याचे समजले.

पथकाने दोन पंचांसह सापळा लावून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने त्याचा साथीदार आर्यन अरुण कोरी, वय २१, रा. मध्यप्रदेश (सध्या बुटीबोरी, नागपूर) याच्यासह हदगावात चोऱ्या केल्याची कबुली दिली. आर्यनला यापूर्वीच अटक झाली आहे. रोख रक्कम ९८ हजार ५०० रुपये, रेडमी कंपनीचा मोबाईल १५ हजार रुपये असा १ लाख १३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तपासात आरोपी हदगाव पोलीस ठाण्यातील ५ गुन्ह्यांत फरार असल्याचे निष्पन्न झाले. गु.र.नं. १८२/२०२६, २०५/२०२६, २०६/२०२६, २०८/२०२६ आणि २२१/२०२६. आरोपीला पुढील कारवाईसाठी हदगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# ‘तीस वर्षांचा पल्ला, तपासणी अन् सल्ला’ अभियानास नांदेड जिल्ह्यात प्रारंभ

## ३० वर्षांवरील नागरिकांची असंसर्गजन्य आजारांसाठी मोफत तपासणी

**नांदेड (प्रतिनिधी)-** राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून ‘तीस वर्षांचा पल्ला, तपासणी अन् सल्ला’ हे १०० दिवसांचे आरोग्य अभियान दि. १ सप्टेंबर ते १० डिसेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे. नांदेड जिल्ह्यातील ३० वर्षे व त्यावरील सर्व महिला व पुरुषांची असंसर्गजन्य आजारांसाठी मोफत तपासणी या अभियानांतर्गत करण्यात येणार आहे. नागरिकांनी आपल्या जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात जाऊन आरोग्याची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी केले आहे.

या अभियानाचा मुख्य उद्देश असंसर्गजन्य आजारांचे वेळीच निदान करून बाधित व संशयित रुग्णांना तातडीने योग्य उपचार उपलब्ध करून देणे हा आहे. अभियानांतर्गत ३० वर्षे व त्यावरील ज्या महिला व पुरुषांची आरोग्य तपासणी झालेली नाही, अशा नागरिकांची यादी व नोंदणी करण्यात येणार आहे.

या अभियानात मधुमेह व उच्च रक्तदाबाचे लवकर निदान करण्याबरोबरच तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग यांची प्राथमिक तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीत संशयित आढळणाऱ्या रुग्णांना पुढील तपासणी व उपचारासाठी संदर्भित करण्यात येईल. तपासणीपासून निदान, उपचार आणि पाठपुराव्यापर्यंतची माहिती संबंधित पोर्टलवर अद्ययावत करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी दिली.

हे अभियान जिल्ह्यातील गावपातळीवर मिशन मोडवर राबविण्यात येणार असून, ३० वर्षे व त्यावरील १०० टक्के नागरिकांची असंसर्गजन्य आजारांसाठी तपासणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ‘माझे गाव, आरोग्य संपन्न गाव’ या संकल्पनेसाठी हे अभियान महत्त्वपूर्ण असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी सांगितले.

ग्रामीण भागात आशा स्वयंसेविका, एएनएम व एमपीडब्ल्यू यांच्यामार्फत घरोघरी भेटी देण्यात येणार आहेत. दररोज सुमारे ४० ते ४५ घरांना भेटी देऊन तपासणी न झालेल्या नागरिकांची यादी तयार करण्यात येईल. त्यानंतर समुदाय वैद्यकीय अधिकारी व आरोग्य सेवकांच्या माध्यमातून गावनिहाय पथके तयार करून नागरिकांची प्रत्यक्ष आरोग्य तपासणी करण्यात येईल.

तपासणीनंतर आवश्यकतेनुसार नागरिकांना समुपदेशन तसेच पुढील उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. निदान झालेल्या रुग्णांना उपचार मिळत आहेत की नाही, याबाबत नियमित पाठपुरावाही करण्यात येईल.

या अभियानांतर्गत करण्यात येणाऱ्या सर्व तपासण्यांची माहिती डिजिटल पद्धतीने नोंदविण्यात येणार असून तपासणी, निदान, उपचार व पाठपुराव्याची माहिती पोर्टलवर अद्ययावत केली जाणार आहे. तसेच डॅशबोर्डच्या माध्यमातून अभियानाच्या प्रगतीवर नियमित देखरेख ठेवण्यात येणार आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेलः godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com